
# महाभारत

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे

## खंड ५ : आदिपर्व ५



# महाभारत

## खंड ५ वा : आदिपर्व

अशोक कोठारे

ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवायी होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुु र्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० जून २०१८**

## - अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना मुद्दाम प्राचीन (Archaic) भाषा वापरतात परंतु माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत तीसाहून जास्त खंडांत विभागून दिले आहेत. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी

अपेक्षा आहे. त्यात मूळ आदिपर्वाचे पांच खंड केले आहेत, त्यातील हा पांचवा व शेवटचा खंड आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील  गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, अशोक सम्राटाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहे म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे



माझे ई-मेल – ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते __

## - महाभारत आदिपर्व खंड पांचवा -

### आदिपर्व भाग दोनशे एकवीस

(सुभद्रा हरण पर्व सुरु)

वैशंपायन बोलतात, अहो राजे जनमेजय, थोड्याच दिवसांत त्या रैवतकाच्या पहाडावर एक सोहळा सुरु होणार असतो. त्यात भोज, वृश्नी व अंधक घराण्याचे लोक भाग घेणार असतात. त्यासाठी पुष्कळ धन ते लोक ब्राह्मणांना दान करतात. त्या पहाडाच्या सभोवार बरेच सुंदर वाडे, महाल, बंगले होते ते सगळें सुंदररित्या विविध रत्न, माणकांनी सजवलेले होते. उपवानात अनेक मोठे वृक्ष वाढलेले होते तसेंच मुद्दाम तयार केलेल्या वाटिका होत्या. संगीतकार व वाजंत्री आपापली वाद्ये वाजवत लोकांचे लक्ष खेचण्याचा प्रयत्न करत होते. नृत्यकार व नृत्यांगनी आपापली कसब दाखवत होते. त्यात तंतू वाद्ये, ढोल, नगारे, बासुरी अशी बरीच कांहीं होती. सर्व कांहीं मन रंजवत होते. वृश्नी घराण्याची मंडळी आपल्या सुंदर सजवलेल्या रथातून आले होते. त्यांच्या अंगावर रंगीबेरंगी वस्त्र होती. पायात मजेशीर दिसणारी पादत्राणं होती. कांहीं लोक पायी आले होते त्यांच्या सगळ्या परिवारासह. त्यांची संख्या कित्येक हजारांनी होती.

त्यांचा राजा हलधर (बलराम) सुरा पित आपल्या पत्नी रेवतीसह त्या परिसरात फेरफटका मारत होता. त्याच्या भोवती वाद्यवृंद फेर धरून गाणी वाजवत होती. तेथे वृश्नी घराण्यातील एक जबरदस्त राजा उग्रसेन त्याच्या हजार बायकांसह आणि सुंदर आवाजात गाणार्या गायकांसह सोहळ्यासाठी आला होता. रुक्मिन्या आणि शंव हे मोठे बलाढ्य योद्धे तेथे रथातून आले होते. त्यांच्या गळ्यात फुलांचे सुगंधी हार होते व ते मिरवत मिरवत येत होते. त्यांच्या सगळ्यांच्या अंगावर उंची वस्त्रे होती. स्वर्गिय देवतांसारखे त्यांचे सर्व वागणूक होती. अक्रूर, शरण, गद आणि बभ्रू, निषाध, शरुदेशन, पृथू, विप्रीथू, सत्यक, सत्यकी, भंगाकर, महारव, हार्दिक्य, उद्धव आणि बरेच आणखीन ज्यांची नांवे सांगता येणार नाहीत ते सगळे त्यांच्या बायकांबरोबर त्या गाणार्या व नाचणार्या पथकांसह फिरत होते. त्यामुळें तो पहाडावरील देवाचा सोहळा साजरा होत होता. जसा तो सोहळा सुरु झाला, वासुदेव आणि पार्थ एकत्र तेथे सामील झाले त्यात. ते दोघे तेथे फिरत असतांना तेथे आलेली वसुदेवाची मुलगी व कृष्णाची बहिण भद्रा, त्यांना दिसते. तिच्या अगावर सुंदर

दागिने होते व तिचे सौंदर्य त्यामुळें आणखीनच खुलून येत होते. इतर मुलींत ती वेगळी उठून दिसत होती. जशी अर्जुनाची नजर तिच्यावर पडली त्याला तिच्या वरून नजर काढता येईना. त्याची नजर तिच्यावर खिळून गेली. त्याच्यातील कामदेव जागृत झाला. तो कासाविस झाला. हे सगळे त्याच्याच बरोबर असणार्या कृष्णाला समजते. त्याला अर्जूनाच्या मनात काय घालमेल होत आहे त्याचा अदाज आला. कृष्ण त्याला विचारतो, "कसे काय वाटते"? "तू निरखून पहात आहेस ती माझी बहिण आहे. ती शरणची मामे बहिण आहे. तुझे भले हो, तिचे नांव आहे भद्रा. ती आमच्या वडिलांची आवडती मुलगी आहे. सांग मला, काय तुला तिच्याबद्दल वाटते"? "तसे कांहीं खास वाटत असेल तर मी बोलणी करण्यास तयार आहे". असें बोलून तो गालातल्यागालात हसू लागतो, अर्जुन थोडा शरमिंदा झाल्यासारखा दिसतो. त्यावर अर्जुन त्याला बोलतो, "ती तुझी बहिण व वसुदेवांची कन्या आहे व किती अप्रतिम लावण्यवती सुद्धा आहे, मग ती कोणालाही आवडणारच नाहीं कां"? पुढे तो सांगतो, "जर अशी तुझी बहिण, वृश्नी घराण्याची राजकन्या, माझी झाली तर मी जग जिंकल्यासारखेच होईल नाही कां"? "अरे माझ्या दोस्ता, जनार्दना, आता मला सांग मी काय केले म्हणजे ती माझी होईल"? "ती मिळवण्यासाठी मी कांहींही करण्यास तयार आहे, बोल मी काय करू"? ते ऐकल्यावर हसत हसत, वासुदेव त्याला सांगतो, "पुरुषांसाठी क्षत्रियांमध्ये स्वयंवर हा सर्वमान्य विधी आहे परंतु, ह्या परिस्थितीत ते शक्य होईल असे संभवत नाही कारण, त्यात बर्याच भानगडी आहेत, माझ्या बहिणीच्या मनात काय आहे ते समजत नाही, जर स्वयंवर ठरवला तर ती कोणाला निवडेल ते मला सांगता येत नाही, तिच्या मनाचा ठाव लागत नाही. त्यात पुनः ती तुला अजिबात ओळखत नाही, म्हणून माझ्यामते तू तिच्याशी राक्षस विवाह करावास. क्षत्रियांसाठी असा विवाह कौतुकास्पद मानला जातो". अर्जुन त्याला विचारतो, "अरे, म्हणजे मी नेमके काय करावे असें तुला सुचवायचे आहे"? कृष्ण बोलतो, "असें बघ, तू योग्य वेळ साधून माझ्या बहिणीला पळवून नेशिल, बस, झाला तुझा तिच्याशी विवाह"!

अशारितीने त्या दोघा मित्रात ते पक्के ठरते किं, अर्जुन भद्राला बळजबरीने पळवून नेणार व त्यात त्याला कृष्णाची अपरोक्ष साथ असणार. सगळ्यात पहिला कृष्ण इंद्रप्रस्थाकडे दूत

पाठवतो व तेथे ह्या विवाहाबद्दल सांगून ठेवतो म्हणजे प्रसंगी त्यांची मदत घेता यावी. कारण, यादवांची कन्या पळवून नेणे हि कांहीं सोपी गोष्ट नव्हती. युधिष्ठीराला ते समजते तसे तो त्या विवाहास अनुमोदन देतो व त्यांच्या आगमनाची तयारी करतो कारण बारा वर्षे पूर्ण व्हायला आता एकच वर्ष बाकी होते व अर्जूनाचे येणे अपेक्षित होते.

अशारितीने आदिपर्वातील सुभद्रा हरण पर्वाचा दोनशे एकवीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे बाविसावा

(सुभद्रा हरण पर्व संपले)

वैशंपायन सांगत असतात, धनंजयाला समजते किं, तिच्या भावाची त्या विवाहाला परवानगी आहे, त्यामुळें त्याचा उत्साह द्विगुणीत होतो. त्यानंतर अरे जनमेजया, अर्जुनाला समजते कीं, भद्रा रैवतक पहाडावर रैवतक देवाचे दर्शन करण्यासाठी जाणार आहे. कृष्णाबरोबर सगळी योजना निश्चित होते. तो महारथी कृष्णाच्या सोन्याच्या रथात, ज्याच्या दोनही बाजूंस घंटांच्या माळा लावलेल्या आहेत, ज्यात विविध आयुध तयार ठेवलेली आहेत, ज्याच्या चाकांचा आवाज ढगांच्या गडगडाटासारखा आहे, जो तळपत्या सूर्यासारखा सोनेरी चमकत आहे आणि ज्याला कृष्णाचे आवडते घोडे, शैव व सुग्रीव जोडले आहेत, जाऊन बसतो. त्याने स्वता त्याची शस्त्रे अंगावर परिधान केलेली आहेत, हाताच्या पंजात चामडी हातमोजे आहेत असा तो अर्जुन भद्रेला पळवण्याच्या पूर्ण तयारीत असतो. असें वाटत होते कोणाही पहाणार्याला कीं, तो शिकारीस निघाला आहे. तेथे ती सुभद्रा तिचे रैवातकाचे दर्शन उरकून व तेथील इतर दैवतांची पुजा करून व ब्राह्मणांना दानधर्म करून त्यांचे आशिर्वाद स्वीकारून, त्या डोंगराची एक प्रदक्षिणा करून द्वारकेला परत निघाली होती. ती एकटी पायीच सावकाश आपल्याच तंद्रीत चालत होती. त्यावेळी तो कुंतीपुत्र तिच्या भावाच्याच प्रेरणेने त्याचा रथ तिच्या कडेला आणतो . तो रथ आपल्या भावाचा आहे हे ओळखून ती विशेष सावधानता न राखता चालत रहाते त्यावेळी अर्जुन तिला रस्त्यावरून उचलून रथात घेतो व रथ इंद्रप्रस्थाकडे वळवतो. भद्रा तिच्याच तंद्रीत असल्यामुळे तिच्या मुखावर मंद स्मित होते. हे सगळे इतके अचानक घडले किं, तिच्या थोड्या अंतरावरून चालत असलेले तिचे रक्षक एकदम घाबरून जातात, त्यांच्याकडे कांही शस्त्रेसुद्धा नव्हती कीं, ते कांहीं विरोध करतील. रथ इंद्रप्रस्थाकडे म्हणजे उलट्या दिशेने भरधाव जात असतांना ते मात्र धावत त्यांच्या द्वारकेच्या दिशेने गेले व सांगू लागले कीं, त्यांच्या राजकन्येला तो पांडव, आपला पाहुणा पळवून घेऊन गेला. मामला यादवांच्या दरबारात जातो. दरबाराचे प्रमुख अधिकारी सुधर्मासमोर अर्जुनाच्या सामर्थ्याची कल्पना देण्यात येते. त्यानंतर तो त्याचे सोनेरी शंख मोठ्याने वाजवून सगळ्यांना सावध करतो. ते ऐकून भोज, वृश्नी व अंधक टोळ्यातील युवक तेथे त्यांच्या तयारीने जमा होतात.

जे जेवत होते ते जेवण टाकून येतात, जे पाणी पित होते ते तसेंच येतात, जे झोपले होते ते उठून येतात, दरबारात त्याच्या सुवर्णानी मढलेल्या रत्नजडीत आसनांवर येऊन बसतात. तो दरबार एकाद्या स्वर्गातील सभेसारखा वाटत होता. त्यानंतर तो मुख्य अधिकारी वृश्नी लोकांतील लढवय्यांचे बाबत बोलून त्यांचा धीर वाढवतो. ते संपल्यावर त्यातला एक उठून ओरडून सांगतो अर्जूनाने काय आगाऊपणा केला आहे. तो सांगतो, मर्दानो, आपापल्या रथाला घोडे जोडा व त्याच्या मागे जाऊन आपल्या भद्रेला घेऊन या. कांहीं ओरडतात आपली शस्त्रे तयार करा, कांहींनी त्यांचे सोन्याची लगाम असलेले घोडे तयार केले पाठलाग करण्यासाठी. अशी सगळी घाई चालू असतांना त्याचा एक नेता बलराम जो कृष्णाचा व भद्राचासुद्धा भाऊ होता, ज्याने वनफुलांच्या माळा गळ्यात घातल्या होत्या व जो कैलासासारखा प्रचंड भासत होता, जो प्यालेल्या सुरेमुळें मस्त झाला होता, पहातो कीं, कृष्ण निष्काळजीने आरामात बसला आहे. त्याला शंका येते कारण भद्रावर त्याचेसुद्धा तितकेच प्रेम होते. तो कृष्णाला विचारतो, "अरें जनार्दना, तुला कांहीं लाजशरम आहेकां, येथे आपली बहिण पळवली जात आहे व तू असा आरामात कसा बसला आहेस? आम्हाला काय वेड लागले आहे कां कीं आम्ही उगाचच ही तयारी करत आहोत. तुझ्या मनात काय आहे ते सांग". ते ऐकल्यावर तेथे जमलेले सगळे जोरांने ओरडून बोलतात, "हे उत्तम होईल, कृष्णांने त्याच्या मनात काय आहे ते सांगांवे". असें बोलून ते सगळे द्वारकावासी पुनः त्यांच्या आसनांवर जाऊन बसतात. हलधर पुन्हा कृष्णाला ऐकवतो, अरे, तुझा मित्र म्हणून आम्ही त्याचा एवढा सन्मान केला, असा कसा हा नीच माणूस जो ज्या ताटात खातो त्याच ताटात घाण करतो. एवढ्या उच्च घराण्यात जन्मलेला तुझा मित्र असा कसा वागला"? ह्या एका पांडवाने आमचा अपमान केला आहे भद्राला पळवून हे तुझ्या ध्यानात येत नाही कां? त्याला त्याचा प्राण गमवायचा आहे कां? त्याने असे करून माझ्या डोक्यावर पाय दिला आहे हे तुला दिसत नाही"? "अरे गोविंदा, असा घाबरटा सारखा काय बसला आहेस. मी आताच ह्या जगातून सगळ्या कुरुंना नष्ट करून टाकतो म्हणजे मला शांती मिळेल. अर्जूनाच्या ह्या आगाऊपणाची किंमत त्यांनी चुकवली पाहिजे". असें बोलल्यानंतर ते भोज, वृश्नी व अंधक त्याला अनुमोदन देतात व

रणशिंग फुकूं लागतात . अशारितीने आदिपर्वातील सुभद्रा हरण पर्वाचा दोनशे बावीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे तेवीसावा

(हरण हरण पर्व सुरु)

वैशंपायन पुढे सांगतात, जसा वृश्नींचा नायक बलराम पुनः पुन्हा अर्जुनाच्या नांवाने लाखोली वाहू लागतो, वासुदेव ते सहन न झाल्याने खूप अर्थपूर्ण असें मोलाचे बोलतो, "अरे गुडाकेशा, असें करून माझ्या मित्राने आपला अपमान केला आहे असें तुला कां वाटते"? "माझ्यामते, असें करून उलट त्यांने आपला सन्मान केला आहे. पार्थाला माहीत आहे कीं, आपण क्षत्रिय नाही. आपण सतवत वंशाचे गौळी आहोत. स्वयंवरापेक्षा राक्षस विवाह जास्त श्रेष्ठ असें ते क्षत्रिय मानतात. ब्राह्मण लग्नात कन्यादान करतात तेसुद्धा एकादे जनावर देण्यासारखे म्हणून हलक्या प्रकारचे समजले जाते. तो उच्चकुलिन क्षत्रिय आहे, तरी त्यांने आपली बहिण निवडली हा आपला मोठा मान आहे हे प्रथम लक्षात घे. अरे, क्षत्रियांत मुलगी अशारितीने पळवणे धाडसाचे व पुरुषार्थाचे समजले जाते हे तू जाणतोस. क्षत्रिय समजतात, जो माणूस आपले अपत्य विकतो तो कसला माणूस, तो एक पशु असें ते मानतात. आपण सुत म्हणचे वैश्य व शुद्र ह्याच्या मधील वर्णाचे आहोत त्यामुळें जे घडले त्यात आपला गौरव झाला आहे हे प्रथम लक्षात घे. म्हणूनच मी माझा रथ त्याला त्या कामासाठी दिला. माझे काम तुला माहीत आहे, दूरदृष्टचे असते. आपली बहिण इंद्रप्रस्थाची राणी होणार आहे हे चांगले कीं वाईट ते तू आता ठरव. अर्जुनाने प्रथम माझ्याकडे तिचा हात मागितला होता पण मीच त्याला असें करण्यास सांगितले. खरे तर बलरामा, तू मोठ्या सन्मानाने जाऊन त्या दोघांना घेऊन परत यावे व त्यांचा विवाह धुमधडाक्याने आपल्या सौती पद्धतीने करावा ह्यातच सगळ्यांचे हित आहे. दोन उत्तम गुणी एकत्र आले त्यात काय बिघडले ते सांग. कां विरोध करावा अशा संबंधाला? आता तू मला सांग माझ्या भावा, ह्यापेक्षा जास्त चांगला पति आपल्या भगिनीला आपल्यात मिळाला असतां कां"? "आणखीन एक लक्षात घे त्यांची आई कुंतीभोजाची मुलगी म्हणजे एकापरीने तो आपल्यातलाच नाहीं कां? तो आपला आतेभाऊ आहे व आतेभाऊ व मामेबहिण (सुभद्रा अर्जूनाची मामेबहिण असते) ह्यांत लग्न होते मग त्याला विरोध कशाला"? नंतर कृष्ण हलधराला बोलतो, "आता सांग, काय करावयाचे तू ठरवले आहेस"? पुढे कृष्ण हसत बोलतो, "तू त्या शूराला हरवण्याच्या गोष्टी करत होतास, अरे.

ज्याची इंद्र किंवा महादेवच बरोबरी करू शकतात तेथे तू व तुझे यादव काय करणार होते". "माझ्या मते, फार वेळ व्यर्थ न घालवता तू त्वरित निघ व त्यांना मन वळवून प्रेमांने परत घेऊन ये, त्याला सांग, पळवण्याची गरज नाही, ती तुला देण्यासाठीच आहे, म्हणजे उत्तम होईल, आपला मान व इज्जतसुद्धा शाबूत राहिल. येथे आल्यावर त्यांचा आपण चांगल्याप्रकारे विवाह लावून देऊ. जर तू त्याच्याशी लढण्यास गेलास व मार खाऊन आलास तर त्यात आपली बेअब्रू होईल तेव्हां त्याच्याशी दोन हात करण्याचा विचार सोडून दे. आपल्याला पाडवांशी स्नेह संबंध राखावयाचे आहेत".

कृष्णाचे ते बोलणे  ऐकल्यावर सगळेच भोज, अंधक व वृश्नी समजले कीं जे होत आहे त्यात आपले हित आहे. हा विवाह झालाच पाहिजे व द्वारकेतच झाला पाहिजे. वैशंपायन नंतर जनमेजयाला सांगतात, ते सगळे मोठ्या संख्येने शस्त्रे बाजूला ठेवून व विवाह प्रसंगी जी वाजंत्री वाजवतात ती घेऊन अर्जुनाला परत आणण्यासाठी त्याच्या मागून जातात.

तेथे वाटेत रथ वेगांने इंद्रप्रस्थाकडे जात असतांना सुभद्रा सावध होते कारण त्या झटापटीत तिला भोवळ आली होती. ती पहाते तो अर्जुन तिचा आतेभाऊ तिला घेऊन जात आहे. ती धनंजयाला तिच्या नाजूक आवाजात विचारते, "अशारितीने तू मला कां पळवत आहेस"? अर्जुन सांगतो जे संभाषण तिच्या भावात व त्याच्यात झाले. ते ऐकून ती वृश्नीनी हसून बोलते, "माझ्या भावाला असें कां वाटले किं, मी तुला स्वयंवरात निवडले नसते? कांहीं समजत नाही". नंतर ती वृश्नीनी त्याला रथ थांबण्यास सांगते. तो रथ थांबवतो. भद्रा त्याला सांगते, "अर्जुना, आपण परत जाऊ व तेथे मी तुला वरत आहे असें सांगेन मग तुझ्या व माझ्या मनासारखे होईल. आमचा सुतात मुलींना असें पळवून नेत नाहीत जसे तुमच्यात करतात, मी रितसर विधीपूर्वक लग्न करूनच तुझ्या बरोबर जाऊ इच्छिते. नंतर ती मिस्किलपणे त्याला टोमणा मारते, "आम्ही सुत क्षत्रियांपेक्षा जास्त सुसंस्कृत आहोत असें पळवा पळवी करत नाही". ते ऐकून अर्जुन त्यातील विरोधाभास समजतो पण तो राहू शकत नाही म्हणून तो सांगतो, "हे पहा राणी सरकार, ही पळवून नेण्याची योजना तुमच्या भावाचीच होती". त्यावर ती दोघेही हसत रहातात. तेथे त्यांचा रथ फार दूर गेलेला नसल्यामुळें त्यांना मागून येणार्या यादवांच्या रणभेरी ऐकू येतात नंतर ती थाबतात व त्या मागून विवाहाची वाजंत्री ते ऐकतात. भद्रा ते ऐकल्यावर धनंजयाकडे

आनंदाने हसत पहाते, व ती सांगते, "ते पहा, आपल्याला परत बोलावत आहेत माझी माहेरची माणसे". तिचे ते आशादायक बोलणे ऐकल्यावर अर्जुनाला धीर येतो.
थोड्याच वेळांत द्वारकावासी त्यांच्या पर्यंत पोहोचतात व त्यांच्या रथाला घेर घालतात. हलधर त्याच्या रथातून उतरतो व मोठ्या प्रेमांने अर्जुनाला विनंति करतो कीं, त्यांने कृपया परत यावे कारण, वसुदेवांनी त्यांची मुलगी व आमची लाडकी बहिण तुलाच द्यावयाचे ठरवले होते, तुला घाई झाली ते पाहून आम्हा सर्वांना विलक्षण संतोष होत आहे. त्यांचे मोठ्या थाटामाटात सौती पद्धतीने लग्न होते. तेथे तो मोठ्या मजेत एक पूर्ण वर्ष काढतो. ते वनवासाचे शेवटचे वर्ष होते. तेथून ते उभयता पुष्कर तीर्थी जातात. बारा वर्षे पूर्ण केल्यावर तो आपल्या दुसर्या पत्नीला घेऊन खांडवप्रस्थास जातो.
खाडवप्रस्थात आल्यावर प्रथम तो युधिष्ठीराला व कुंतीला पाया पडून वंदन करतो. त्यानंतर तो ब्राह्मणांना नमस्कार करतो. त्यानंतर तो द्रौपदीला भेटतो. तेव्हां सवती द्वेषांने ती फणकारून बोलते, "काय पण एक सुत कन्याच मिळाली कां बारा बर्षांत? दुसरी आली कीं पहिली नको होते कां"? "जा, तुम्ही त्या सतवत सुतांच्या मुलीकडेच रहा. कृष्णाला सुभद्राचे असें येणे आवडत नाही. ती खूप नाराज होते. एवढे ती बोलली तरी तो तेथून जात नाही तेव्हां ती कुचेष्टेने त्याला बोलते, "आता इकडे कशासाठी रेंगाळत अहात, स्वामी"? तिचा राग तो समजू शकतो म्हणून तो तिची समजून काढण्याचा बराच प्रयास करत रहातो. त्यानंतर तो त्याच्या सुभद्रेकडे जातो. ती नववधू लाल रंगाचे रेशमी लुगडे नेसून त्याची वाट पहात असते. कृष्णाच्या दटावणीमुळें हताश झालेला अर्जुन आपल्या नव्या पत्नीस ते लाल कपडे काढण्यास सांगतो व तिने साधारण गवळीण बाई सारखे कपडे घालावेत असें तिला सांगतो, सुभद्रा काय झाले ते समजते व ते मनावर न घेता त्याप्रमाणे कपडे बदलण्यासाठी आंतील कक्षात तिच्या दालनात जाते. परंतु, गंमत अशी किं, ती त्या साध्या गवळीणीच्या कपड्यात जास्त खुलून दिसते. त्या कपड्यात कांहीं वेगळांच दिमाख होता. ते कपडे जास्त श्रीमंती होते. खरेतर तशा कपड्यातच त्याला ती प्रथम दिसली होती. भद्रा प्रथम तिच्या सासूला भेटून पाया पडते व पुजा करते जशी पद्धत सतवत सुतांच्या मध्ये होती. कुती तिच्या भावाच्या मुलीस प्रेमांने जवळ घेते व तिच्या कपाळाचे चुंबन घेते. तिला अनेक आशिर्वाद देते. आपली भाचीच आपली सून झाली

त्याचे तिला फार बरे वाटते. भद्राचे सौंदर्य पाहून सगळे अचंबित होतात. त्यानंतर ती कुंती बरोबर तिच्या सवतीस पाया पडते व तिला बोलते, "मी तुमची दासी आहे असे समजून मला वागवले तरी चालेल". भद्रा माधवाची बहिण आहे हे समजल्यावर तिला तिची चूक समजते व तिचा पारा उतरतो व ती चटकन भद्राला जवळ घेऊन मिठी मारते. तिला बोलते, "तुझा नवरा अजातशत्रू होवो". त्यावर भद्रा "तथास्तू" असें बोलते. त्या भेटीत त्या दोघीं मधील आकस संपुष्टात येतो व ते सगळे गुण्यागोविंदाने नांदू लागतात.
वैशंपायन पुढे सांगतात, त्या भद्राच्या भावाला समजते कीं, ते दोघे इंद्रप्रस्थाला पोहोचले तेव्हां तो मोठ्या तयारीने आपल्या मोठ्या भावासह आणि इतर दरबार्यांना घेऊन निघतो आंदण देण्यासाठी. त्यात त्यांचे इतर आप्त सामील झाले होते. त्यात अंधक व वृश्नी टोळ्यांचे जास्त होते. ते सगळे लढवय्ये इंद्रप्रस्थाला निघाले. त्यांत सौरिन त्याच्या प्रचंड सैन्यानिशी निघाला होता. त्याबरोबर महारथी बुद्धीमान अक्रुर जो यादवांच्या सैन्याचा प्रमुख होता. अनध्रिश्ति जो त्याच्या धाडसासाठी ओळखला जात होता, त्यानंतर उद्धव जो माणसांत साक्षात बृहस्पतिचा शिष्य होता, त्याशिवाय वृश्नीतील सत्यकी आणि सल्यक, कृतवर्मन, शातवत, प्रद्युम्न, सम्व, निशात्ब्त, शंकू, शरूदेशन, झुल्ली, विप्रीथू, शरण, विद्वान गद असें बरेच वृश्नी व भोज टोळीचे आले होते. असें सगळे इंद्रप्रस्थाला आले होते. ते त्यांच्या बरोबर अगणित धन आंदण म्हणून आणतात. राजा युधिष्ठीर ते त्यांचे चांदले मोठ्या आनंदाने स्वीकारतो. त्यांचे स्वागत करण्यासाठी तो नकुल व सहदेवाला पाठवतो. वृश्नी जरी क्षत्रिय नव्हते तरी सुत वर्णाचे संपन्न लोक होते त्यामुळे त्यांनी त्यांच्या मुलीसाठी व नवीन नात्यासाठी त्यांच्या योग्यतेचे आंदण आणलेले होते. ते नगरात शिरतात ते त्यांचे ध्वज पताका फडकवत येतात. ती मिरवणूक मोठी विलोभनीय होती. त्यांच्या आगमनासाठी पांडवांनी रस्ते स्वच्छ केले होते, चंदनाचे पाणी शिंपडले होते त्यामुळें संपूर्ण वातावरण सुगंधी वासांने प्रसन्न झालेले होते. ठिकठिकाणी लोबन जाळल्यामुळें त्याचा सुगंध पसरला होता. सगळे इंद्रप्रस्थवासी त्यांचे स्वागत करत होते. त्या शहरात सुत वर्णाच्या उद्योजकांची मोठी संख्या असल्यामुळें त्या विवाहाबद्दल त्या सगळ्यांना कुतुहल होते. त्या मिरवणूकीत पुढे कृष्ण व बलराम होते. त्यांचे नगरात आगमन झाल्यावर त्यांचे तेथील हजारोंच्या संख्येने रहिवाशी व ब्राह्मण स्वागत करतात.

केशव राजवाड्यात प्रवेश करतो, तो राजवाडा इंद्राच्या महाला सारखाच भव्य दिव्य होता. बलरामाला येतांना पाहून युधिष्ठीर पुढे होतो व त्यांचे स्वागत करतो. स्वागताचे रितसर शिष्टाचार उरकल्यानंतर युधिष्ठीर कृष्ण व बलरामांला आलिंगन देतो. कृष्ण भिमालासुद्धा मिठी मारून त्याचे अभिष्टचिंतन करतो. त्यानंतर इतर महत्वाच्या अभ्यागतांचे रितसर स्वागत होते. त्यात वृश्नी, भोज आणि अंधक टोळ्यांचे प्रतिष्ठीत लोक असतात. हृषिकेश त्यानंतर आणलेले आंदण त्यांना बहाल करतो. त्यानंतर सुभद्राच्या मित्रमैत्रिणींनी दिलेल्या भेटवस्तु सादर केल्या जातात.

कृष्ण पांडवांना सोन्याच्या छोट्या घंटांनी सजवलेले रथ भेट देतो. त्या प्रत्येकाला उत्तम घोडे जोडलेले होते व त्या बरोबर सारथीसुद्धा होते. मथुराच्या खास एक हजार गाई तो भेट देतो. त्या गाई भरपूर दूध देण्याबद्दल प्रसिद्ध होत्या. दिसायलासुद्धा त्या फार सुंदर होत्या. खुष झालेला तो नवरीचा भाऊ, जनार्दन आणखीन एक हजार शुभ्र रंगाच्या एक हजार अति वेगवान घोड्या बहाल करतो. एक हजार खेचरं जे वेगांने धावू शकत देतो. त्यांचे रंग शुभ्र व शेपट्या काळ्या होत्या. त्याशिवाय एक हजार दास्या देतो ज्या मन रंझवण्याच्या कामात तरबेज होत्या. त्या तरुण व कुमारिका होत्या. त्यांच्या अंगावर सोन्याचे दागिने होते. वल्हिक देशातील प्रसिद्ध घोडे जे गाड्या खेचण्यासाठी वापरत ते एक हजार असतात. तो दशरथांच्या परंपरेतील राजा आपल्या लाडक्या सुभद्रेसाठी दहा खटारे भरून असली सोने व कांहीं हिणकस देतो. महायोद्धा हलधर ज्याचे आयुध आहे नांगर, अर्जूनाला डोंगरासारखे प्रचंड आकार असलेले व ज्यांच्या कपाळातून, कानांतून व गुदातून मद वहात आहे असें एक हजार उत्तम हत्ती देतो. त्या प्रत्येक हत्तीवर रत्न माणकांनी मढवलेल्या सोन्याच्या मदारी बसवलेल्या होत्या ज्यातून प्रवास करावा अथवा युद्ध करावे. त्याशिवाय अगणित इतर उपयोगाच्या गोष्टी जसें कपडे, पांघरुणं चादरी इत्यादी होते. त्या वैभव संपन्न आंदणामुळें पांडवांची सांपत्तिक परिस्थिती अशी झाली किं शत्रू त्या कल्पनेने हादरून जावेत. युधिष्ठीर ते सगळे स्वीकारतो व अभ्यागतांचे शुभचिंतन करतो. ते सगळे पाहुणे व पांडव कांहीं दिवस तेथे मजेत घालवतात. नांचत, टाळ्या वाजवत, खेळत असें ते योद्धे आनंदात वेळ घालवतात. त्यानंतर बलराम व इतर पाहुणे वृश्नी व अंधक टोळ्यांतील, कुरु राजांने दिलेल्या अगणित भेटवस्तु व जवाहर घेऊन ते

द्वारकेला निघतात. परंतु, कृष्ण मात्र तेथेच इंद्रप्रस्थातच थांबतो. तेथे ते यमुनेच्या किनारी मृगया करण्यासाठी भटकतात. तेथे ते दोघे हरणं व डुक्करं मारतात.

यथावकाश सुभद्रेला एक पुत्र रत्न होते. जसें इंद्राला जयंत झाला होता. त्या मुलांचे हात अजानुबाहू होते. त्याच्या क्रोधी स्वभावामुळें व धाडसामुळें त्याचे नांव अभिमन्यू असें ठेवतात. अर्जुनाचा तो पुत्र मोठा शत्रूघ्न होणार असें वाटते. धनंजयाला तो एका सुत वर्णाच्या पत्नीपासून झालेला असतो. त्या अभिमन्यूच्या जन्माखातर युधिष्ठीर ब्राह्मणांना दहा हजार गाई व तितकीच सुवर्णाची नाणी दान करतो. तो मुलगा कृष्णाचा फार लाडका होतो. तसांच तो सगळ्या कांकांचा व आजीचासुद्धा आवडता होतो. त्याच्या जन्माचे विधी यथासांग पार पडतात. ते बाळ सावकाश वाढत असतें. त्याचे शिक्षण सुरु होते. वेद व इतर शास्त्रं तो शिकतो. विविध आयुधांचा वापर कसा करावा त्याचे बारीक शिक्षण त्याला मिळत असते. त्यातील चपळाई कशी ठेवावी ते तो शिकतो. तो त्याच्या पित्यासारखा त्या विद्यांत तरबेज होतो. ते पाहून अर्जुनाला फार संतोष होत असतो. जसा आनंद इंद्राला होत असें जेव्हां तो अर्जूनाला प्रगती करतांना पाहून होत असें. अभिमन्यू एक हुशार योद्धा झाला, त्याच्या अंगावर त्याप्रमाणे शुभ लक्षणेसुद्धा होती. तो त्याच्या बापासारखा उंच व धिप्पाड झाला होता. त्याचा आवाज धीरगंभीर व तीक्ष्ण होता जसा योद्ध्याचा असला पाहिजे. त्याच्यात त्याच्या मामाचे दामोदराचे सौंदर्य उतरले होते. त्याच सुमारास द्रौपदीला तिच्या पांच नवर्यांपासून पांच पुत्र झाले होते. ते सगळे त्यांच्या बापासारखेच बलिष्ठ, धाडसी, शूर व उत्तम गुणी होते. युधिष्ठीराला झालेल्या मुलांचे नांव होते, प्रतिविंध्य, भिमाच्या मुलांचे सुतसोम, अर्जुनाच्या मुलाचे श्रुतकर्मन, नकुलाच्या मुलांचे शतनिक आणि सहदेवाच्या मुलांचे, श्रुतसेन अशी नांवे होती. ते सगळे त्यांच्या पित्या सारखेच बलाढ्य योद्धे झाले होते. जसें आदितीने आदित्य प्रसवले तसे ते झाले होते. त्यांची नांवे ठेवतांना ब्राह्मणांचा सल्ला घेतला होता तेव्हां तो युधिष्ठीरीला बोलला कीं, त्याचा पुत्र विंध्य पर्वतासारखा शत्रूचा मुकाबला करील म्हणून त्याचे नांव प्रतिविंध्य ठेवले. भिमांने एक हजार सोमयज्ञ केल्यानंतर त्याचा मुलगा झाला म्हणून त्याचे नांव सुतसोम ठेवले गेले. अर्जुनाचा मुलगा त्याच्या वनवासानंतर जन्मला व त्या वनवासाच्या काळांत त्यांने अनेक पराक्रम केले होते म्हणून त्याचे नांव श्रुतकर्मन ठेवले गेले. नकुलाच्या मुलाचे नांव एका

कुरु कुळात होऊन गेलेल्या राजर्षींच्या नांवे ठेवले होते, शतनिक. सहदेवाचा मुलगा कार्तिक नक्षत्रात जन्मला म्हणून त्याचे नांव श्रुतसेन अथवा कार्तिकेय अशी ती नांवं ठेवली गेली होती. द्रौपदीला झालेली मुलं एकेक वर्षाच्या अंतराने जन्मली होती. ते सगळे अतिशय गुणी व एकमेकांशी एकनिष्ठ असे होते. त्यांचे पहिले केस कांपणे (जायवळ विधी) व तसें सगळे विधी शास्त्रानुसार धौमऋषींनी संपन्न केले होते. लहानपणी वेदांचा अभ्यास केल्यावर ते काकाच्या मार्गदर्शना खाली मंत्रविद्या व शस्त्रविद्या शिकले होते. त्यात ते तरबेज झाले होते. अशारितीने चांगली पुत्र संपदा प्राप्त झाल्यामुळें ते सगळे पांडव फार संतुष्ट होते. ती सगळी मुलं त्यांच्या अपेक्षेप्रमाणे, सर्वगुण संपन्न होती.

अशारितीने आदिपर्वातील हरण हरण पर्व संपले.

*टीपः सुत वर्णात जे लोक येतात त्यांची माहिती येथे थोडक्यात देत आहे. ते महत्वाचे आहे कारण, हिंदूंच्या सर्वच क्षेत्रांत त्यांचे मोठे योगदान असूनही त्यांचा पाहिजे तसा स्वतंत्र उल्लेख होत नाही. महाभारत काळाच्या प्रथेनुसार चार वर्णातील वैश्य व शुद्र ह्यांच्या मध्ये हा वर्ण येतो. सुत माणसाचा उल्लेख सौती केला जातो. ह्या वर्णातील लोक व्यवसाय व सेवा अशी दोनही कामं करीत असतं. त्यात येणारे व्यवसाय असें आहेत, गवळी, माळी, न्हावी, शिंपी, सुतार, कोळी, लोहार, पांचाळ, चारी, कुंभार, शिल्पी, शिल्पकार, गवंडी, चांभार, धोबी, पाथरवट, नट, विदूषक, जोशी, वैद्य (वैदू), मांत्रिक, तांत्रिक, जोतिषी, कवी, लेखक, शिकलगार अशी कामं ते करत असत. फार मोठ्या ख्यातनाम सुतांची नांवें पहा, वाल्मिकी, कृष्ण द्वैपायन, श्रीकृष्ण, वराहमिहीर, भास्कराचार्य, कल्हन, सुश्रूत, आर्यभट्ट, कालिदास, वाग्भट्ट, बरेच आयुर्वेदाचार्य सुत वर्णाचे आहेत. पुष्कळ सौती त्यांचा मूळ पुरुष म्हणून विश्वकर्माला मानतात. कालांतरानें खर्या वैदिक ब्राह्मणांचे वंश नष्ट झाले, त्याचा फायदा घेऊन कांहीं धूर्त सुतांनी स्वताला ब्राह्मण सांगावयास सुरुवात केली, त्यातील जोशी, वैद्य अशा आडनांवातील बहुतेक मुळचें सौती वर्णाचे आहेत. ब्राह्मणाना समाजात विशेष स्थान असल्यामुळें तसे झाले असावे. बर्याच वेळा आपण अनेक विद्वत्तेची कामं ब्राह्मणांनी केली असें मानतो ती सगळी वस्तुतः सुतांनी केली आहेत. गणित, ज्योतिष, नक्षत्र गणित, आयुर्वेद, रसायन शास्त्र, स्थापत्य अशा शास्त्रीय विषयातील हिंदूंचे योगदान सुतांचे आहे. सुत वर्णाच्या लोकांचे विशेष असें किं,*

*त्याच्यात नवीन कल्पना विकसित करण्याची प्रतिभा, प्रज्ञा असते. अभियांत्रिकी क्षेत्रात त्यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांच्यातून रचनाकार, मूर्तिकार, शिल्पकार असें जन्म घेतात. त्यांच्यात नवीन शोध लावण्याची क्षमता असते. आज आपल्या येथे जे बलुतेदार आहेत ते सुतवर्णाचे असतात. प्रसिद्ध सुतांच्या नांवाची एक छोटी यादी दिली आहे त्यावरून किती श्रेष्ठ दर्जाचे हे आहेत ह्याची कल्पना येईल. वैदीक काळापासून ब्राह्मण फक्त अध्यात्मिक क्षेत्रात गुंतलेले होते. कर्मकांडापलिकडे त्यांची दृष्टी गेली नाही. इतर गोष्टीत लक्ष घालणे त्यांच्या प्रथेत नव्हते. ते कधीच वास्तविक क्षेत्रांतील विषयांत लक्ष घालत नसतं. शुद्ध अध्यात्मात ब्राह्मणांचे योगदान होते. सर्वच तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत ब्राह्मणांचे स्थान प्रथम होते, सांख्य, न्याय, मिमांसा, वैशेषिक, वेदांत, योग अशा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात प्रामुख्याने ब्राह्मण होते. त्यातसुद्धा वाल्मिकी व व्यास ह्या सौतींचे योगदान सर्वश्रेष्ठ आहे. ह्या दोघांनी नितीशास्त्राचे धडे त्यांच्या महाकाव्यांतून दिले, वाल्मिकींचे रामायण व व्यासांचे महाभारत ही दोन महाकाव्ये हिंदूंच्या शिक्षण व्यवस्थेचा पाया होत्या. नितीशास्त्रात व्यासांची भगवद्गीता व वाल्मिकींचे योग वासिष्ठ महत्वाचे आहेत. खर्या हिंदू धर्माचा पाया वाल्मिकींच्या योगवासिष्ठ मध्ये आहे. म्हणजे त्या क्षेत्रातसुद्धा सौती पुढे होते. विषयाच्या अज्ञानामुळें बरेच सौती ब्राह्मण समजले गेले होते. कांहीं सौती स्वताला क्षत्रिय सांगतात. सौतींमध्ये राजे आणि सामान्य सेवक असें दोनही असू शकतात हे ह्या वर्णाचे विशेष आहे. परंतु, सुत वर्णात अनेक वंशाचे व जातीचे लोक आहेत म्हणून त्याला वंश अथवा जात म्हणता येत नाही तो वर्णच आहे.*

*योगक्षेम म्हणजे दैनंदीन जीवन साध्य करण्याचे कार्य. त्याचे चार प्रकार केले आहेत, त्यांना चार वर्ण म्हणून ओळखले जाते. त्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे येतात. सुत वर्णाचे वैशिष्ट्य असें आहे किं, ते ह्या चारही प्रकारे आपला योगक्षेम साध्या करू शकतात. म्हणून तो एक असा वर्ण आहे जो त्या चारांचा समाईक वर्ण ठरतो. आज आपला हिंदू समाज सुत वर्णाच्या पद्धतीने जात आहे.*

# आदिपर्व भाग दोनशे चोवीसावा

(खांडव दहन पर्व सुरु)

वैशंपायन बोलतात, पांडवांनी धृतराष्ट्र व भिष्मांच्या आज्ञेने खांडवप्रस्थाचा कारभार घेऊन त्यात विलक्षण सुधारणा केल्यावर ते आजूबाजुच्या राज्यात आक्रमण करून त्यांच्या अधिराज्याच्या सीमा वाढवण्यास सुरुवात केली. जेथे ते गेले त्या राज्याचा विकास त्यांने केला व न्याय आणि सुव्यवस्था इतकी चांगली केली कीं, तेथील प्रजाजन सुखी झाले. युधिष्ठीराच्या राज्यात सद्‌गुण, सुख आणि हित असें सगळे संतुलित प्रमाणात लोकांना अनुभवावयास मिळत होते. त्यांच्या राज्यात प्रथम प्रजेचे सुख व नंतर राजाचे असा कार्यांचा अग्रक्रम होता, त्यामुळें प्रजेवर कधीही अन्याय झाला नाही व कधीही कोणाला तक्रार करण्याची वेळ आली नाही. वेदाच्या अभ्यासाला त्यांच्या राज्यात प्राधान्य असें. त्याच्याकडून सगळ्या लहान राज्यांना मोठ्या भावासारखे संरक्षण मिळत असें त्यामुळें पांडवांची किर्ती सर्वदूर पसरली. शांतता व सुव्यवस्था आल्यामुळें लोकांना स्वास्थ्य मिळत होते व त्यामुळें त्यांच्या राज्यात लोकांचा अध्यात्मिक विकास वृद्धींगत होत गेला. त्याच्या चार भावांच्या सहाय्यामुळें त्याचे वैभव वाढत होते. अनेक विद्वान ब्राह्मण अर्जुनाच्या नेतृत्वाखाली युधिष्ठीराला मदत करत होते जसें स्वर्गात सिद्ध इंद्राला मदत करतात. लोक युधिष्ठीरावर प्रेम करत होते कारण, तो त्या योग्यतेचा होता. तो राजा सज्जन लोकांच्या इच्छेनुसार कारभार करत होता. त्यामुळें सगळे सज्जन लोक त्याच्यावर प्रसंन्न होते. लोकांचे भले करण्यात धन्यता मानणारा तो राजा त्याच्या राज्यात सुखांने रहात होता. त्याला कोणी शत्रू उरला नव्हता.

कांहीं दिवसांनतर, दामोदर व अर्जुन आपल्या परिवारासह यमुना किनारी असलेल्या वनात सहलीसाठी जाण्याचे ठरवतात. तेथे रानात, नदीच्या पाण्यात ते भटकून श्रमपरिहास करण्याचा बेत करतात. युधिष्ठीराच्या परवानगीने ते सगळे निघतात. ते अशी जागा निवडतात जेथे भरपूर वनश्री आहे व त्याचप्रमाणे मोठे वाडे आहेत जेथे ते राहू शकतील. पुष्कळ खाण्यापिण्याचे पदार्थ घेऊन तेथे जातात. मजा करण्याच्या उद्देशाने ते जात असतात म्हणून ते गळ्यात फुलांच्या माळा, अगावर रंगीबेरंगी कपडे असे नेसून नाचत उडत मजा करत असतात. ज्याच्या त्याच्या कल्पने नुसार ते मजा करत असतात.

त्यांच्या बरोबर त्यांच्या बायका व इतर दासी असतात. त्या सुंदर असतात, त्यांच्या सौंदर्यामुळें आसमंत प्रसंन्न झाला होता. कांहीं पाण्यात उतरतात तर कांहीं वनात भटकत रहातात. त्यांच्या बायका सुरा पिऊन तर्र झाल्या होत्या. सर्वकांहीं मजेत चालले होते. कोणी गाऊ लागले तर कोणी नांचू लागले. कोणी एकमेकांची मस्करी करण्यात मजा समजत होते. त्यांच्या वर मद्याचा प्रभाव हळू हळू वाढत होता. मद्याच्या प्रभावामुळें ज्या निष्पाप हरकती माणसे करतात त्या तेथे होत होत्या. कोणी नुसते एकमेकांशी गप्पा मारण्यात समाधानी होते. त्या त्यांच्या वागण्यामुळें जो आवाज त्यांची वाद्ये करीत होती त्यामुळें तेथील वाडे व महाल अगदी दणाणून निघत होते. सर्वकांहीं आनंदमय आहे ह्याचा त्यामुळें साक्षात्कार होत होता. हे असें सगळे मजेत होत असतांना जनार्दन व जिश्नु एका तेथीलच पण थोड्या लांब अशा जागी जातात आणि तेथे असलेल्या रत्नजडीत महागड्या बैठकांवर जाऊन बसतात. तेथे थोडा निवांत असतो. तेथें ते भूतकाळात होऊन गेलेल्या मजेशीर घटनांचा मागोवा घेत गप्पा मारत बसतात. असे ते गप्पा मारत असतां तेथे एक ब्राह्मण त्याच्या पुढे येतो. साल वृक्षासारखा उंच, सोनेरी अंगकाती, त्याची दाढी हिरव्या छटा असलेली परंतु, पिवळ्या रंगाची, आणि बांधा त्याच्या उंची प्रमाणे प्रमाणबद्ध होता असा तो ब्राह्मण त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करतो. त्याचे केस अव्यवस्थित असें वाढलेले, अंगावर चिंध्या असा तो ब्राह्मण खूप तेजस्वी वाटत होता. त्याला येतांना पाहून अर्जुन व वासुदेव दोघे उठून उभे रहातात.

अशारितीने आदिपर्वातील खांडव दहन पर्वाचा दोनशे चोविसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे पंचविसावा

(खांडव दहन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, त्यांच्या जवळ आल्यावर तो ब्राह्मण त्यांना सांगतो, "अहो अर्जुन व वासुदेव सुता, तुम्ही दोघे ह्या जगातील सर्वश्रेष्ठ वीर अहात हे मी जाणतो. मी एक खादाड ब्राह्मण आहे. मला खूप खावे लागते. तू वृश्नी वंशाचा व तू पांडव आपण दोघे फार चांगले अहात, मला खूप खावयाला द्याल तर बरे होईल". ते ऐकल्यावर कृष्ण व अर्जुन त्याला खाणे देण्यासाठी आपल्या सेवकांना बोलावण्याचा प्रयत्न करतात तसें तो उंचापुरा ब्राह्मण त्यांना सांगतो, "अहो, मी तसे अन्न खात नाही. मी अग्नी आहे, मला खाण्यासाठी जंगल पाहिजे. हे खांडव वन नेहमी इंद्र सतत पाऊस पाडून इतके ओले चिंब करतो किं मी ते खाऊ शकत नाही, म्हणून तुम्ही असें कांहीं करा की इंद्र येथे पाऊस पाडणार नाही. ह्या जंगलात जे प्राणी रहातात त्यांच्या सकट ते मला खावयाचे आहे. त्यात रहाणारे नाग, जे तक्षकाचे आहेत, त्यांना नेहमी इंद्र संरक्षण देतो कारण तक्षकाला त्यांने समुद्र मंथनाच्या वेळी तसे आश्वासन दिले होते. म्हणून मी तुमच्या कडे आलो आहे कारण, फक्त तुम्ही दोघेंच ते साध्य करू शकता. तुमच्याकडे पावसाला रोकण्याची क्षमता असणारे अस्त्र आहेत ती वापरून जर तुम्ही पाऊस थांबवला तर ते सहज शक्य होईल.

जनमेजय उत्सुकतेने वैशंपायन ऋषीला विचारतो, "पण अग्नीला ते जंगल त्यातील प्राण्यांसकट कां खावयाचे होते"? त्या मागे तसेंच कांहीं कारण असणार, तरी ते सगळे मला तुमच्या कडून ऐकावयाचे आहे".

वैशंपायन सांगतात, "जसे पूर्वीच्या ऋषींनी पुराणात सांगितले व मी ऐकले अगदी तसेंच मी आता तुला सांगतो".

अहो राजे, ऐका, आता मी खांडव वनाच्या आगीची कथा सांगतो. असें सांगतात, फार प्राचीन काळी एक राजा होऊन गेला. त्याचे नांव स्वेतकी असें होते. सामर्थ्यात तो इंद्रा प्रमाणें होता. बुद्धीमत्ता, दानधर्म व यज्ञयाग ह्यात तो अव्वल होता. स्वेतकीने पांच प्रमुख यज्ञ केले त्या बरोबर इतर बरेच यज्ञ सुद्धा त्याने केले. त्या प्रत्येक यज्ञात तो ब्राह्मणांना भरपूर दान दक्षिणा देत असें. त्याला त्या गोष्टी करण्याचे एकापरीने व्यसन लागले होते. त्याच्या कडे त्यासाठी खास तयार असलेले ऋद्विक होते. अशारितीने अनेक वर्षे यज्ञ

करण्यामुळें त्या ऋद्विगांचे डोळे सतत अग्नीसमोर बसल्यामुळें त्यातून प्रत्येक वेळी तुपाची धार लावल्याने जो धूर निघत असें त्याच्या तापांने बिघडून गेले. त्यामुळे त्या यज्ञाच्या कामाला ते अखेरीस कंटाळले व स्वेतकी राजाला सोडून गेले. राजा सदैव पैशाचे आमिष दाखवत होता व प्रत्येक वेळी नवनवीन ऋद्विक कामाला लावत होता पण ते सुद्धा त्याच कारणांने वैतागून यज्ञ सोडून जात असतं. असें अनेक ऋद्विक आले व गेले अशारितीने अखेरीस तो राजा यज्ञ शंभर वर्षानी पूर्ण करतो. त्यानंतर कांहीं काळानंतर स्वेतकी राजाला पुनः एक यज्ञ करण्याची इच्छा होते. परंतु, त्याला तो नवीन यज्ञ करण्यासाठी कोणी ऋद्विक मिळत नाही. तो त्याच्या कडील ब्राह्मणांना आमिष दाखवून यज्ञ करण्यास बोलवत होता पण त्याला त्यात यश येत नव्हते. त्या यज्ञाने तो खूप मोठे सामर्थ्य प्राप्त करणार होता पण सगळे व्यर्थ. कोणीही येत नाही म्हणून शेवटी तो राजा रागावतो. रांगाने तो त्याच्या दरबारातील बाह्मणांना बोलतो कीं, "मी तुम्हाला सगळे देत असतांना तुम्ही माझे एवढे काम करत नाही त्याचा अर्थ काय"? "मला दिसत नाही कांहीं योग्य कारण ज्यासाठी तुम्ही यज्ञ करण्यास नकार देता". तुम्हाला मला मदत करावीच लागेल आणि जर तुम्ही मला मदत करणार नसाल तर मी दुसरे ऋद्विक बोलावीन". एवढे बोलून राजा हवालदिल झाल्यासारखा गप्प झाला. त्या ब्राह्मणांना तो यज्ञ करावयाचा नसल्याने ते रागावल्याचे सोग घेऊन राजाला बोलतात, "तुमचे यज्ञ शंभर वर्षे चालतात ते करणे आम्हाला शक्य नाही, आम्ही पार थकून गेलो आहोत. आम्हाला विश्रांतिची गरज आहे. पण जर तुम्हाला असें दीर्घ काळ चालणारे यज्ञ करावयाचेच असतील तर त्यासाठी रुद्राकडे जा. तो तुम्हाला मदत जरूर करील कारण त्याला आमच्या सारख्या शरीराच्या मर्यादा नाहीत. ते ऐकून तो राजा आणखीनच क्रुद्ध झाला. त्यानंतर तो कैलासाला जातो व वैराग्य प्राप्त करून तपस्या करू लागतो महादेवाला प्रसंन्न करण्यासाठी. तेथे महादेवावर एकटक असें त्राटकात तो ध्यान करू लागतो. अन्न पाणी सगळ्याचा त्याने त्याग केलेला असतो. प्रसंगी जी फळं मिळतील तेवढी खाऊन तो त्याची तपस्या चालू ठेवतो. दिवसाचे सोळा तास ते कधी संपूर्ण दिवस तो ध्यानात असे, रुद्राला प्रसन्न करण्यासाठी. एकाद्या झाडासारखे तो उभे राहून तप करीत होता. शेवटी शंकरदेव त्यावर प्रसंन्न होतात. देव शात आवाजात त्याला बोलतात, "मी तुझ्या वैराग्यपूर्ण तपस्येने प्रसंन्न झालो आहे. काय

तुला पाहिजे ते सांग". राजा बोलतो, "अहो महादेव, आपण सगळ्या त्रैलोकाचे स्वामी अहात, आपण मला प्रसंन्न झाला अहात तर मला माझ्या यज्ञात आपण मदत करावी". ते ऐकून देव त्याला सांगतो, "अरे मानवा, मी स्वतः कोणत्याही कामात मदत करत नाही. परंतु, जे तप तू केले आहेस ते पहाता मला वाटते मी तुला मदत केली पाहिजे. पण त्यासाठी तुला एका अटीवरच मी ती मदत करू शकतो". राजा खूष होऊन विचारतो, "बोला रुद्र, मी काय केले पाहिजे, ते मी करीन जर तुम्ही यज्ञात मला मदत करणार असाल". "माझी अट अशी किं, तू स्वतः यज्ञात तुपाची धार लावशिल व त्या यज्ञाच्या काळात तुझे वीर्य गळणार नाही असें ब्रह्मचर्य तू आचरशिल". (हिंदू योगशास्त्रात दोन प्रकारचे ब्रह्मचर्य सांगितले आहे. एक देहाचे ज्यात वीर्य न गळणे हे महत्वाचे असते, दुसरे आत्म्याचे, त्यात शरीराचे वीर्य गळणे अथवा न गळणे ह्याला महत्व नसते. ह्या अटीप्रमाणे देवाला राजानें दोनही प्रकारची ब्रह्मचर्ये पाळण्याचे बंधन घातले आहे.) राजा त्याप्रमाणे सगळे करतो. बारा वर्षांनी तो राजा पुनः महादेवाकडे जातो. त्याला पाहून कैलासनाथ बोलतात, "मी तुझ्यावर संतुष्ट झालो आहे. परंतु, यज्ञात केवळ ब्राह्मणच आहुति देतात. त्यामुळें मी तुला त्यात सहाय करू शकत नाही परंतु, एक ब्राह्मण आहे तो तुला मदत करील. तो ऋद्विक माझाच एक हिस्सा आहे. त्याचे नांव आहे दुर्वास. तोच तुला ह्यापुढे यज्ञात मदत करील. म्हणून तू जा आणि पुढील तयारी कर". ते ऐकल्यावर तो राजा इतर तयारीला लागतो. सर्व तयारी पूर्ण झाल्यावर तो पुन्हा रुद्राला भेटतो. "मी सगळी तयारी केलेली आहे, आपल्या कृपेने सर्व होत आहे. म्हणून मी उद्याच यज्ञाच्या कामाला सुरुवात करावी कां"? स्वेतकीची तयारी लक्षात घेऊन रुद्र दुर्वासाला बोलावणे धाडतो. महादेव त्याना सांगतो, हा राजा मोठा महान आहे त्याच्या यज्ञात तू त्यासाठी मदत करशिल. त्यावर दुर्वास बोलतात, "तथास्तु", दुर्वास येतात व तो यज्ञ संपन्न होतो. राजा सगळ्या सहायक ब्राह्मणांना अपेक्षित दक्षिणा देतो. त्यानंतर दुर्वाससुद्धा आपल्या घरी जातात. सगळे मनासारखे झाल्यामुळें स्वेतकी राजाला जे त्या यज्ञातून हवे होते ते मिळते. ब्राह्मणांना दक्षिणा मिळाल्यामुळें तेसुद्धा खूष असतात. सगळे ब्राह्मण वेदांतील ऋचा गाऊन राजाची स्तुति करतात. राजाची प्रजासुद्धा समृद्ध होते. अशारितीने त्या राजाची यज्ञ

करण्याची हौस पूर्ण होते. यथावकाश तो महान राजा स्वेतकी मृत्यूनंतर त्याला मदत करणार्या ऋद्विकांसह आणि साध्यांसह स्वर्गात जातो.

वैशंपायन पुढे सांगतात, त्या यज्ञात जे तूप अग्नीत ओतले होते त्यामुळे अग्नीची भूक नष्ट झाली व तो कांहींच भक्षण करेनासा झाला. अग्नी फिक्कट पडला. त्याची ती चमक नष्ट झाली. त्याची शक्ति हळू हळू कमी होत गेली. त्याची शक्ति कमी झाल्याने त्याला अशक्तपणा जाणवू लागला. शेवटी अग्नीदेव ब्रह्मदेवाकडे गेला व म्हणाला, "अहो ब्रह्मदेवा त्या स्वेतकीने मला जास्तच तूप खाण्यास दिले त्यामुळें मी कांहीं भक्षण करण्याच्या अवस्थेत राहिलेलो नाही. माझे तेज व क्षमता दोनही कमकुवत झाली आहेत. मला ते पुनः पूर्ववत करावयाचे आहेत". ते अग्नीचे हताश होऊन केलेले बोलणे ऐकून देव हसले व म्हणाले, "अरे अग्नी, तू तब्बल बारा वर्षे तूप पित होतास, त्यामुळें तुला अतिपोषणाची बाधा झाली आहे. परंतु तू काळजी करू नकोस, तू पुनः पूर्ववत होशिल, मी तुला त्या अतिपोषणातून मुक्त करीन. त्यासाठी वेळसुद्धा येऊन ठेपली आहे. अरे विभावत्सु, तू एकेकाळी ते भयंकर खांडववन भक्ष केले होतेस, देवांना मदत करण्यासाठी हे आठवते कां? ते आता पुनः पूर्ववत झाले आहे, त्यात देवांचे शत्रू प्राणी अर्थात् सर्प व इतर श्वापदं ह्यांची संख्या वाढलेली आहे ते तुला खावयाचे आहे, ते केल्याने तुझ्या मध्ये त्या प्राण्याची चरबी जाईल व त्या तूपाचा परिणाम नाहीसा होईल आणि तुला तुझी गेलेली भूक पुन्हा प्राप्त होईल. म्हणून तू आत्ताच तेथे जा व ते खांडववन भक्ष्य करं".

ते ब्रह्मदेवाचे सांगणे ऐकल्यावर हुताशनि लागलीच मोठ्या जोमांने खांडववनाकडे आला. त्यांने त्याची जिभ बाहेर काढली आणि वायूला मदतीस बोलावले, खांडववन जळत आहे ते पाहून तेथे रहाणार्या सगळ्यानी ती आग विझवण्याचा प्रयास केला. हजारो हत्तींनी त्यांच्या भल्यामोठ्या सोंडींनी नदीतून पाणी आणून ती आग विझवली. रागावलेल्या नांगांनी त्यांच्या हजारो फण्याने पाणी ज्वाळांवर मारून ती विझवण्याचा प्रयत्न केला. त्याशिवाय इतर प्राण्यांनी हर प्रकारे ती आग विझवली कारण अग्नीत पूर्वीसारखा जोर नव्हता. त्या अग्नीने पुनः पुन्हा आग पेटवली व त्या प्रत्येक वेळी ती विझवली गेली कारण तो अग्नी अशक्त झाला होता आणि त्यां खांडव वनातील रहिवाशांना इंद्राची साथ होती. हुताशनित ती आग चालू ठेवण्याची शक्ति उरलेली नव्हती.

तब्बल सात वेळा असा प्रयत्न अग्नीने केला परंतु, प्रत्येक वेळा तो स्थानिक रहिवाशांनी अयशस्वी ठरवला.

अशारितीने आदिपर्वातील खांडववन दहन पर्वाचा दोनशे पंचविसावा भाग संपला.

# आदि पर्व भाग दोनशे सव्वीसावा

(खांडववन दहन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, त्यानंतर हव्यावहन (अग्नी) रागावून आपल्या कर्माला दोष देत पुन्हा ब्रह्मदेवाकडे गेला. त्याला जे घडले ते सांगितले. मग देव बोलले, "अहो पुण्यवान, मला एकच पर्याय दिसतो, ज्या मार्गाने तू खांडववन अगदी इंद्रासमक्ष जाळू शकशिल. आता काय सांगतो ते नीट ऐक, त्या प्राचीन देवता, नर व नरायण हल्ली माणसाच्या अवतारात पृथ्वीवर आल्या आहेत कांहीं पूण्यकर्म उरकण्यासाठी, त्यांना पृथ्वीवरील लोक अर्जुन व वासुदेव अशा नांवांने ओळखतात. हल्ली ते दोघे त्या वानातच वस्ती करून आहेत. त्यांना विनंती कर, म्हणजे तुला ते जंगल जाळणे शक्य होईल कारण, त्यांची शक्ति तुला मिळेल व त्यामुळें तुझ्या कमी शक्तिची उणीव भरून निघेल. ते दोघे इंद्राला अडवू शकतात तसेंच त्या वनातून त्या रहिवाशी प्राण्यांनासुद्धा तेथून पळून  जाऊ देणार नाहीत. एकदा तसे झाले किं, तुझी शक्ति तुला पुन्हा प्राप्त हेईल. त्यांना कसेही तुला मनवून घ्यावे लागेल".

ते ब्रह्माचे ऐकल्यावर तातडीने तो अग्नी थेट अर्जुन व कृष्ण जेथे बसले होते तेथे आलेला असतो. ते ऐकल्यावर ते दोघे त्यांच्याकडे काय साधन सामुग्री आहे कीं, ज्याच्या मदतीने ते इंद्राशी मुकाबला करू शकतील व त्याचप्रमाणे नाग व पिशाच्चांना अडवू शकतील ह्याचा अंदाज घेता, अर्जुन सांगतो, हा रथ अशा कामासाठी पुरेसा नाही. माझ्याकडे जे बाण आहेत त्यांने ते काम होणार नाही, तसेंच जे घोडे असावयास पाहिजेत ते हे नव्हेत. जरी माझ्याकडे इंद्राला अडवणारी अनेक अस्त्रं असली तरी ती आता उपलब्ध नाहीत त्यांना वापरण्या आधी सिद्ध करावे लागते त्याला वेळ लागतो, त्यासाठी फुरसद नाही. कृष्ण बोलतो, माझी सिद्धी वापरता येईल अशी साधन सामुग्री सुद्धा येथे नाही कारण, आपण येथे युद्धाच्या तयारीने आलेलो नाही. जर ते सर्व उपलब्ध झाले तरच आम्ही तुला मदत करू शकू असें ते दोघे अग्नीला सांगतात.

अशारितीने आदिपर्वातील खांडव वन दहन पर्वाचा दोनशे सव्वीसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे सत्ताविसावा

(खांडववन दहन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, अर्जुनाने त्याच्या अडचणींची कल्पना अग्नीला दिल्यावर अग्नी वरुणाशी बोलणी करण्याचे ठरवतो. त्याला आठवण करून देतो, अदितीचा एक मुलगा जो स्वर्गाचा कांहीं भाग सांभाळतो व त्याचे स्थान पृथ्वीतील समुद्रात आहे, जो पंचमहाभूतांवर सत्ता गाजवत आहे. वरुणाला माहीत होते किं, पावकांने त्याचा विचार केला होता. म्हणून ताबडतोब तो त्याच्या पुढे हजर होतो. अग्नी त्या जलदेवतेचे स्वागत करतो. तो चौथा लोकपाल आहे, तो त्या जगाच्या धन्यास बोलतो, "कृपया मला ते धनुष्य व बाण ज्याला गांडीव म्हणतात, आणि तो रथ ज्यावर हनुमानाचे चिन्ह आहे तो द्या जो तुम्ही सोमाकडून मिळवलेला आहे. त्याच्या मदतीने पार्थ जो मला मदत करत आहे, मोठे कार्य यशस्वी करणार आहे. त्याचप्रमाणे, तुमचे सुदर्शन चक्र द्या कारण त्याने कृष्ण मला मदत करणार आहे. त्या तीन गोष्टी त्वरित द्या मला कारण तशी प्रजापतिचीसुद्धा इच्छा आहे". ते ऐकून वरुण पावकाला सांगतो, "बरे, मी ते द्यायला तयार आहे". असें बोलून तो ते सामर्थ्यवान गांडीव व रथ देतो. त्या गांडीवामुळें त्याची किर्ती सर्वदूर पसरणार होती. विशेष म्हणजे त्याचा नाश कोणत्याही दुसर्या आयुधाने होऊ शकणार नसतो. ते दोन सर्व आयुधात श्रेष्ठ होते. त्यांच्यापेक्षा जास्त कार्यक्षम आयुध नाही. गांडीव शंभर हजार धनुष्यांपेक्षा जास्त कार्यक्षम होते. त्याच्या सहायांने तो साम्राज्य मिळवू शकणार होता. त्याचे स्वरुप रंगीबेरंगी होते. ते पहाण्यास सुंदर होते. त्यात कोणतीही कमतरता नव्हती. त्याची पुजा स्वर्गिय देव आणि गंधर्व करीत असतात. वरुण अर्जुनाला दोन कधीही न संपणारे भाते देतो त्यामुळें त्याला पाहिजे त्या प्रकारचे बाण तो सतत भडिमार करून मारू शकत होता. वरुण अर्जुनाला एक वेगवान रथ देतो ज्यावर मारुतीचे चिन्ह असलेला ध्वज होता. त्या रथाला दोन घोडे जोडलेले होते. त्या रथात सर्व प्रकारची स्वर्गिय आयुधे होती त्यांचा वापर करून तो हमखास जिंकणार होता. तो रथ कोणी देव किंवा असुर नष्ट करू शकणार नव्हता. त्याचे सौंदर्य कमालीचे होते आणि त्याच्या चाकांचा आवाज ढगांच्या गडगडाटा सारखा मोठा होता. जो कोणी त्याचे दर्शन घेईल तो त्या दर्शनाने खूष होईल असें ते होते. तो रथ साक्षात विश्वकर्मांने मोठी तपस्या करून घडवला होता. त्याच्यातून तेज उत्कटत होते

त्यामुळें त्याकडे डोळ्याने पहाणे संभव नव्हते. ह्याच रथातून जाऊन सोमांने दानवांचा पराभव केला होता. संध्याकाळच्या मावळत्या सूर्याच्या तांबड्या किरणांना परतवणारा असा त्यातून सुंदर प्रकाश येत होता. त्याच्या ध्वजाचा दांडा सोनेरी रंगाचा व सरळ उंच वर जाणारा असा होता. त्यावरील झेंड्यावर त्या प्रतापी हनुमानाचे चिन्ह होते ज्यांने राम व लक्ष्मणाला वाचवले होते. त्या मारुतिची मुद्रा अशी होती किं, जणूकाय तो आत्ताच सगळे भस्मसात करणार आहे. त्या मुख्य ध्वजा खाली आणखीन दोन ध्वज होते त्यावर इतर हिंस्त्र श्वापदाची चित्र होती. रथामध्ये अर्जुन चढतो, तो सगळी आयुधं सज्ज ठेवतो, पंजात कातडीचे मोजे घालतो जे युद्धावर जाणारे लढवय्ये घालतात. अंगावर चिलखत नेसतो. त्या रथात तशा तयारीने तो महायोद्धा थोडा फिरतो. जणूकाय तो स्वर्गावर स्वारी करण्यासाठी निघत आहे. अर्जुनाला अतिशय आनंद झालेला असतो किं, तो त्या रथातून साक्षात इंद्रावर स्वारी करणार आहे. हुताशनिला तो वंदन करतो. त्यानंतर मोठ्या हिमतीने तो ते गांडीव उचलतो. त्याचा दोर अडकवतो व ते बरोबर ताणून घेतो. गांडीवाच्या टणत्काराने आसमंत दणाणून जातो. त्या आवाजाने आसमंतातील माणसे घाबरून बाहेर येतात किं, काय झाले आहे? एवढ्या सज्जतेने त्याचे समाधान झाले व तो त्या कामगिरीस जाण्यासाठी सज्ज होतो. अर्जुनाची तयारी अशारितीने झाल्यावर पावक कृष्णाला त्याचे सुदर्शन चक्र देतो. त्या चक्राच्या मध्यातून एक लोखंडी सळी घातलेली होती. त्या सळीवर ते चक्र स्वता भोवती गोल फिरत होते. ते शस्त्र माधवाचे आवडते होते. असा तयारीमुळें ते दोघे त्याच्या त्या कामासाठी जाण्यास सज्ज होतात. अहो मधू राक्षसाला ठार मारणार्या माधवा, एवढ्या तयारीमुळें तुम्ही दोघे माणसा बरोबर इतर शक्तींचासुद्धा पराभव करू शकाल ह्याबद्दल मला खात्री वाटते. माणसें, राक्षस, पिशाच्चे, देव, दैत्य, नाग असें कोणीही तुमच्या पुढे आले तर तुम्ही त्याचा फडशा पाडाल. तुझे चक्र वैर्याला मारून पुन्हा तुझ्याकडे येईल. कांहीं राहून जाऊ नये म्हणून कीं काय, वरूण कृष्णाला एक गदा देतो जिचे नांव कौमादकी होते. ते जवळ आलेल्या दैत्याला मारण्यासाठी होते, कारण दैत्य मोठ्या शिताफीने युद्ध करतांना वेगांने अंगावर येत असतात. एवढ्या जय्यत तयारीवर खूष झालेले दोघे वीर पावकाला बोलतात, "एवढ्या पक्क्या तयारीनी आम्ही सगळ्या दैत्याना व राक्षसांना, ते एकत्र आले तरी हरवू शकू.

तक्षकाला मदत करण्यासाठी तो इंद्र आला तरी त्यालासुद्धा आम्ही भारी आहोत. अरें अग्नी, जेव्हां मी हृशिकेष ह्या चक्राने लढतो तेव्हां तिनही जगातील कोणीही माझ्यापुढे उभा राहू शकणार नाही. त्यात अर्जूनाकडे ते दोन भाते तू आणून दिले आहेस, जे कधीही संपत नाहीत, मग कांहीं चिंता करण्याचे तुला कारण नाही. तेव्हां आता तू तुझ्या जिभा (ज्वाळा) बाहेर काढ व खांडव वन भक्षणाचे तुझे काम सुरु कर. आम्ही तुझ्या बरोबर आहोत".
वैशंपायन पुढे बोलतात, अशारितीने त्या अग्नीदेवाला दशरथाने व अर्जुनाने उत्तेजन दिल्यावर तो पावक, अग्नी मोठ्या उत्साहाने ते जंगल जाळण्यास सुरुवात करतो. त्याच्या सात जिभा सगळे भाजून काढत नष्ट करत होत्या. युगांताच्या वेळी जसा तो सगळे संपवतो तसे तो सगळे खांडववन भक्षण करत होता. त्याच्या त्या आधाशा सारख्या खाण्यामुळें तेथील प्राणी भयभीत झाले होते. तो अग्नी सगळ्या बाजूनी ते वन जाळत होता. त्या जळण्यामुळें ते जंगल प्रकाशमय झाले होते त्या अंधार्या रात्री.
अशारितीने आदिपर्वातील खांडववन दहन पर्वाचा दोनशे सत्ताविसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे अठ्ठाविसावा

(खांडववन दहन पर्व पुढे चालू)

वैशंपायन बोलतात, त्यानंतर तो दोघे महायोद्धे महारथी त्यांच्या रथांतून त्या जंगलाच्या विरुद्ध बाजूंनी स्वारी करतात. तेथून आगीपासून वाचण्यासाठी पळून जाणार्या प्राण्यांचा ते नाश करू लागतात. त्या आगीपासून पळून जाणार्या प्राण्याना ते मारत होते. ते दोघे अशाप्रकारे काम करत होते कीं, जणू ते एकच आहेत व त्यांचे दोन रथ सुद्धा एकच आहेत. त्या आगीत असंख्य प्राणी जळून मरत होते. कोणाचे सगळे अंग जळलेले होते तर कोणाचे फक्त कांही अवयव जळाले होते. कोणी त्या प्रखर उष्णतेमुळें करपून गेले होते. कोणी भितीने पळत होते, ते जोरांने ओरडत होते, त्यांच्या जीवाच्या आकांताने सगळे जंगल भरून गेले होते. कोणी त्यांच्या लहानग्याना न सोडवल्यामुळें त्यांच्या बरोबर तेथेच एकत्रपणे मरत होते. साक्षात विध्वंस होत होता. कांहीं जोरांने त्या जाळांतून बाहेर उडी मारतात पण पुनः त्यात पडतात. कांहीं त्या जाळात होरपळून जातांना गोल गोल फिरत होते. मेल्यानंतर त्यांचे अवयव अग्नी सावकाशपणे भक्ष करत होता. सगळें निरनिराळ्या प्रकारे परंतु, जळून नष्ट होत होते. त्याला अपवाद नव्हते. जे पळून जाण्याचा प्रयत्न करत होते त्यांना अर्जुन व कृष्ण त्यांच्या आयुधांनी हाणून मारत होते. त्या खांडववनात असेलेले तलाव व विहीरी त्यातील पाणी उकळत होते व त्यामुळें त्यात आरामात व थंडाव्यात रहाणारे जलचर शिजवल्यासारखे भाजून मरत होते. तेथे जळून मेलेल्या प्राण्यांचे कलेवर पाहिले कीं, असें वाटत होते जणूकाय अग्नीनी ती विविध रुपे धारण केली आहेत. तो पूर्णपणे भस्मीभूत झालेले प्राण्यांचे सांगाडे वेगवेगळे आकार घेऊन तेथे उभे होते, जास्त जळल्यावर ते राख होऊन खाली कोसळत होते. अर्जुनाच्या बाणांच्या भडीमारापुढे कोणताही प्राणी टिकाव धरू शकत नव्हता. आकाशात उडणारे पक्षी आगीच्या धगामुळें उडता उडताच कोसळून पडत होते. त्यांच्या कर्णकर्कश किंचाळ्या सगळीकडे ऐकू येत होत्या. त्याच आगीच्या ज्वाळांचे वार्यामुळें होणारे आवाज भर घालत होते. अर्जुनाच्या सहस्त्र बाणांमुळें मरणार्या प्राण्यांचे ओरडणे प्राचीन काळी जेव्हां समुद्र मंथन झाले तेव्हा ओरडणार्या माशांच्या किंचाळण्याची आठवण करत होते. ती आग इतकी मोठी झाली कीं, त्याच्या ज्वाळा आकाशाला भिडल्या. त्यामुळें स्वर्गात रहाणार्या देवांनी

त्या आगीची धास्ती वाटू लागली. स्वर्गात रहाणार्या ज्येष्ठ मंडळींनी त्या आगीची दखल घेतली. ती आग अशी होती कीं, कोणी हजारो यज्ञ एकाच वेळी पृथ्वीवर करत आहेत कां, असे त्यांना वाटू लागले. तो स्वर्गाचा राजा असुरांचा कर्दनकाळ, इंद्रसुद्धा सावध झाला. ते विचारी लागले, काय होत आहे तेथे ते समजले पाहिजे. अहो इंद्र जगाचा अंत जवळ आला आहे कां?

वैशंपायन पुढे सांगतात, ते त्या ज्येष्ठांचे विचारणे ऐकून देव जागे झाले व एकमेकांना तोंच प्रश्न विचारू लागले. देव व त्यांचा राजा ज्याने वृत्राचा नाश केला असें सगळे खाली काय होत आहे ते पाहू लागले. खांडव वन कां जळत आहे? ते विचारू लागले. ती आग वेळीच नाही विझवली तर ती स्वर्गापर्यंत पोहोचेल व ते योग्य नाही म्हणून शक्र ढगांना आदेश देतो किं, त्यानी खांडववनावर जमावे. त्याप्रमाणे काळी पाण्याची ढगं त्या आकाशात मोठ्या संख्येने एकत्र येतात व एकदम मुसळधार पाऊस पडू लागतो. त्याच्या धारा दांडासारख्या जाड होत्या. त्याच्यापुढे ती आग टिकणे शक्यच नव्हते. परंतु, खाली इतकी आग होती कीं, तिच्या उष्णतेमुळें ते पावसाचे पाणी वाफ होऊन उडून जात होते. ते पाहून तो नमुचीला ठार मारणारा देवांचा राजा चिडला. तो जणू त्याचा अपमान होता. त्यात त्या खांडववनातील साप मरत असल्याचे समजल्यामुळें तो तक्षकाचा मित्र आणखीनच क्रुद्ध झाला. त्यांनी आणखीन मोठे ढग आणून आणखीन जलधारा त्या खांडववनावर धरल्या. त्यांच्या वाफांचे ढग आता खालून वर येऊ लागले, तो संपूर्ण प्रदेश धूर व राख ह्यांनी भरून गेला होता. ते पहाणे भितीदायक होते. नभातून विजांचा कडकडाट व खाली जळणार्या लाकडांचा तडतडाट असें आवाज त्या भागात सर्व नष्ट होत असल्याची खूण देत होते. त्यात अर्जुनाच्या व कृष्णाच्या फेर्या त्या जळणार्या खांडववना भोवती चालूच होत्या.

अशारितीने आदिपर्वातील खांडववन दहन पर्वाचा दोनशे अठ्ठाविसावा भाग संपला.

# आदीपर्व भाग दोनशे एकोणतीस

(खांडववन दहन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, त्यानंतर विभत्सू (अर्जुन) त्याचे हमखास अस्त्र काढतो तो पाऊस थांबवण्यासाठी. त्या अस्त्राच्या प्रभावाने तो इंद्राने जोरात सुरु केलेला तो मुसळधार पाऊस थांबवला. अर्जुनाच्या सहस्त्र बाणांने त्या खांडववनातील आकाश अशारितीने भरलेले होते कीं, त्या पावसाचे थेंब खाली जमिनीवर येऊ शकत नव्हते. जसें धुक्याने वातावरण भरलेले असते. त्यामुळें कोणीही पशु त्या जंगलातून बाहेर येऊ शकत नव्हते. जंगल जळत असतां त्याचा राजा तक्षक मात्र तेथे नव्हता. तो त्याच्या दुसर्या ठिकाणी, कुरुक्षेत्री रहायला गेला होता. परंतु, त्याचा बलाढ्य मुलगा अश्वसेन मात्र तेथे अडकला होता. त्याची जलसर्प आई त्याला वाचवण्यासाठी त्याला तोंडापासून गिळावयास लागते. त्यानंतर शेपटापासून असें गिळत असतांना अर्जुन ते समजतो व एका बाणांने तिचे तोंड फोडून टाकतो. त्यामुळें ती त्यात मरते पण अश्वसेन वाचतो. ते सगळे इंद्र पहातो, त्याला त्याच्या मित्राचे कुटूंब वाचवण्याची इच्छा असते म्हणून तो विजेचा कडकडाट सुरु करतो. फार जोरात वावटळ तो सुरु करतो. त्या झटक्यामुळें अर्जुन बेशुद्ध पडतो. त्या थोड्या क्षणात अश्वसेन स्वताला सोडवून घेतो व आकाशातून पळून जातो. अर्जुनाला त्या भ्रम तंत्राची कल्पना येते व त्याच्यावर असा प्रयोग झाला त्याचा त्याला संताप होतो. अशारितीने आपली फसवणूक झाली त्याचा त्याला राग येतो. त्या रागात तो जो प्राणी आकाशातून पळून जातांना दिसेल त्याला तुकडे तुकडे करून मारून टाकण्याचा सपाटा लावतो. विभत्सु, स्वतः अग्नी आणि वासुदेव त्या भ्रमाच्या वापरामुळें एवढे संतापतात किं, ते सर्पांने शाप देतात. तो शाप असा, "तुम्ही कधीही तुमच्या प्रयत्नात यशस्वी होणार नाही". त्याचा संताप एवढा जास्त होता किं अर्जुन त्याच्या बाणांनी सगळे आकाश भरून टाकतो. त्याचा उद्देश त्याच्या जन्मदात्यालाच, त्या सहस्त्र अक्ष इंद्राला आव्हान देण्याचा होता. तो इंद्रावर त्याचे सर्वात जास्त प्रखर अस्त्र सोडतो. इंद्र ते पाहून आकाशात प्रचंड ढगं उत्पन्न करतो. त्याच्या आकर्षणामुळे महासागराचे पाणी उंच उचलले जाते. त्यातून पाऊस कधी नाही असा भयंकर पडू लागतो. आयुधांचा जाणकार अर्जुन वायव्य नांवाचे आयुध फेकतो. त्यामुळें ती ढगं त्या आकाशातून दूर होतात. त्याशिवाय इंद्राच्या

कडकडाट आणि विजांचा लखलखाट व पर्जन्य संपुष्टात येते. सगळीकडे वातावरण कोरडे होते, त्यामुळें पुनः अग्नीला जोर येतो. जंगलात धुमसत असलेल्या कोळशांवर पडलेल्या पाण्यातून ज्वालाग्राही वायू उत्पन्न होतात व त्यामुळें पुनः अग्नी चेतावला जातो. थोड्या वेळात आकाशात सूर्य पुन्हा चमकू लागतो. नेहमीचे वारे व झुळूकी वाहू लागतात. ते झाल्यामुळें तो अग्नीदेव खूष होतो कारण त्याला आता कोणीही अडवू शकत नसतो. जंगलात पडलेल्या जळलेल्या गोष्टींच्या निरनिराळ्या आकारात तो दिसू लागतो. तेथे मेलेल्या प्राण्यांच्या अंगातील चरबीतून तो पुनः चमकू लागतो. कृष्णाने व अर्जुनाने ते जंगल संरक्षित केले आहे असें समजल्यावर गरुडाच्या अनेक जाती ते पहाण्यासाठी स्वर्गातून खाली येतात. कांहीं खाण्यासारखे आहे कां ते पहातात, त्यासाठी त्या जंगलाच्या आकाशावर ते घिरट्या मारू लागतात. ते येतांना पाहून बिळात लपलेले असंख्य नाग त्यांचे फणे विस्फारून त्यांना आव्हान देतांना आणि त्यांच्यावर त्यांचे जहाल वीष पिचकारीसारखे फेकतांना दिसतात. बिळातून बाहेर आलेल्या नागांवर अर्जुन त्याच्या अग्नीच्या बाणांने वार करतो व त्यांना ठार मारतो. मेलेले ते साप त्या आगीत तडफडत पडतात व जळून जातात. त्याच वेळी लढण्याच्या इच्छेने कित्येक असुर, गंधर्व, यक्ष, नाग, आपली शस्त्रे घेऊन मोठ मोठ्या गर्जना करत त्या दोघांवर चाल करून जातात, आकाशातून त्यांच्या मारक आयुधांतून ते लोखंडी गोळे, बारीक गोळ्या, मोठे दगड, लहान फत्तर अशांने हल्ला करतात. ते पाहून चिडलेले ते दोघे वीर उलटा हल्ला करतात. जरी तो त्या इंद्राच्या मित्रांचा हल्ला बिनचूक होता अर्जुनाच्या बाणांमुळें ते सगळे तुटून बारीक होऊन पडत होते. अर्जुनाने त्यांना परत जाण्याचे आवाहन केले पण जे न ऐकता लढत राहिले त्यांना तो त्यांची मुंडकी उडवून मारून टाकतो. कृष्ण त्या अंगावर धावून येणार्या दैत्य, दानव ह्यांच्यावर त्याच्या सुदर्शन चक्राने मारा करतो. त्यांचे तुकडे तुकडे करतो. ते पाहून ते दैत्य, दानव बेघर झाल्यासारखे यमुना नदीच्या दिशेने पळून जातात. ते पाहून शक्र त्याच्या ऐरावतावर बसून आकाशातून येतो. त्याच्या वज्रास्त्राने जे कधीही व्यर्थ जात नाही, हल्ला करतो. तो ओरडून सांगतो, "हे पहा आता ते दोघे मेले". इंद्र वज्राचा उपयोग करत आहे असें पाहिल्यावर इतर देव त्या लढाईत उतरतात. यम त्याचे मुगदळ घेऊन येतो. कुबेर त्याची काटेरी गदा घेऊन येतो, वरूण त्याचा फांसा घेऊन

उतरतो, स्कंद (कार्तिकेय) त्याचा लांबलचक भाला आणतो. ते येऊन एकाद्या डोंगरासारखे स्थिर उभे रहातात. अश्विन त्याचे औषधी हातात धरून उभे असतात, धत्री धनुष्य घेऊन, जय त्याचा सोटा आणतो, तश्त्र रागांने एक मोठ डोंगर उचलून असतो व सूर्य त्याचा तेजस्वी शर घेऊन येतो. मृत्यू कुर्हाड आणतो, आर्यमन त्याचा काटेरी भलामोठा सोटा आणतो, त्याशिवाय पुष, भग आणि सावित्रू रागांने कृष्ण व जिश्नु ह्यांच्या वर चाल त्यांच्या बाकदार तलवारी करीन जातात. रुद्र, वसु, मरुत, विश्वदेव, सध्य त्यांच्या त्यांच्या शक्तिने तेथे इंद्राला अर्जुन व कृष्ण ह्यांच्या विरुद्ध मदत करण्यासाठी तयार असतात. ते दृष्य असें होते जसे जगाच्या अंताच्या वेळी असते. त्यामुळें ते दोन योद्धे न घाबरता तसेंच त्या सगळ्या देवांवर आपल्या शस्त्राने मारा करत रहातात. त्या सगळ्या देवांचा ते पुनः पुन्हा पराभव करत असतात. तरी ते त्यांच्यावर चाल करून येतच असतात. अखेरीस ते एकेक करून माघारी जातात व फक्त इंद्र तेथे रहातो.

स्वर्गातून ऋषी, मुनी ते पहात असतात आणि आश्चर्य करत असतात. त्या दोघांच्या धाडसाचे, हिम्मतीचे आणि शौर्याचे कौतुक करत असतात. अर्जुनाचे शस्त्रातील कसब पाहून इंद्राला आनंद होत असतो करण तो त्याचा जन्मदाता असतो. तो शतयज्ञी इंद्र पुन्हा दगडाधोंड्यांचा मारा करतो पण व्यर्थ. अखेरीस शक्र आपल्या मुलाला मारण्यासाठी मंदार पर्वताचा एक सुळका उपटून काढतो व त्याच्यावर जोरांने फेकतो. अर्जुन त्याच्या बाणांने त्या सुळक्याचे शतशः तुकडे करतो जे आकाशातच इतस्ततः फेकले जातात. त्या चमकणार्या तुकड्यांमुळें असे दृष्य दिसते जणू आकाशातून तारे तुटून पडत आहेत. ते जेव्हां खाली खांडववनात पडतात तेव्हां त्या खाली खांडववनात रहाणारे असंख्य जिवजीवाणू मरून जातात.

अशारितीने आदिपर्वातील खांडव वन दहन पर्वाचा दोनशे एकोणतिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे तीस

(खांडव वन दहन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, त्यानंतर, खांडववनातील रहिवासी दानव, राक्षस, नाग, लांडगे, अस्वलं, कोल्हे व इतर श्वापदं तसेंच मस्त असलेले हत्ती, वाघ, सिंह, घोडे, हरणं, रेडे, असें शेकडो, त्यात पक्षी हे सगळे त्या दगडांच्या वर्षावामुळें घाबरून सैरावैरा पळू लागतात. ते पहातात किं सगळे जंगल चहोबाजूने पेटलेले आहे. अर्जुन व कृष्ण त्यांच्यावर हल्ला करण्यास तयार असलेले ते पहातात. त्या भागात जे घाबरवून टाकणारे भयंकर आवाज होत होते त्यामुळे कित्येक प्राणी त्यांची स्वसंरक्षणाची क्षमता घालवून बसलेले असतात. ती सगळी जनावरं मोठ्या मोठ्याने आकांत करू लागतात. आगीचा कडकडाट व हे ओरडणे ह्यांने जो गोंधळ उडालेला असतो त्याचे काय वर्णन करावे. सावळ्या वर्णाचा केशव त्याचे चक्र मोठे करून त्या घाबरलेल्या प्राण्यावर फेकतो. ते चक्र त्या आधीच घाबरलेल्या प्राण्यांचे शतशः तुकडे करून टाकते. ते तुकडे अग्नीच्या मुखात पडत होते. कृष्णाच्या चक्रामुळें फाटलेले राक्षस चिंधभिंध झालेल्या ढगासारखे वाटत होते. वृश्नी साक्षात यमासारखा तेथे फिरत होता. त्याने असंख्य पिशाच्च, पक्षी, नाग आणि इतर प्रजाती मारले होते. तो पुनः पुन्हा ते त्याचे विध्वंसक चक्र फेकून मारत होता आणखीन प्राण्यांना. प्रत्येक वेळी ते हत्या करून परत त्याच्याकडे परतत असें. नाग, राक्षस, पिशाच्चांची हत्या करतांना त्याचा चेहरा भयंकर वाटत होता. कोणीही देव त्या दोघांना हरवू शकण्यासारखे नव्हते. जसें देवांना समजून चुकले कीं, ते खांडववन वाचवू शकणार नाही, तसें ते परत फिरले, त्या जंगलाला तसेंच जळत ठेवून. इंद्र ते पाहून जणुकाय ते दोघे एकादी परीक्षा उत्तीर्ण झाले असावेत अशाप्रकारे हर्षाने फुलून गेला. त्यावेळी त्याला एक अनाहूत आवाज ऐकू येतो, तो बोलतो, "तुझा मित्र तक्षक त्यातून सुटला आहे कारण ते घडण्याआधी तो त्याच्या दुसर्या घरी कुरुक्षेत्री गेला आहे. अरे वसवा, ते दोघे अर्जुन व कृष्ण अजिंक्य आहेत. अरे, ते कोण आहेत ते तुला माहीत नाही, ते अतिप्राचीन आधीच्या स्वर्गातील आहेत, नर व नारायण. हे दोन ऋषी कोणालाही हरवता येणार नाहीत असें आहेत. त्यांची सन्मानपूर्वक पुजा देवांनी, यक्षांनी, गंधर्वांनी, माणसांनी, किन्नरांनी, नांगानी व राक्षसांनी करायला पाहिजे. म्हणून तू सर्व

देवांना घेऊन ते कर. खांडव वन नष्ट होणे विधीलिखीत होते तसे झाले त्या बद्दल विचार करू नकोस".

जे घडले ते विधीलिखीत होते असें समजल्यावर त्याचा राग व द्वेष दोनही ओसरले. त्याच्या सगळ्या देवलोकांच्या सैन्याला घेऊन तो त्यांच्याकडून निघून जातो. तसे कृष्ण पहातो किं, लढाई संपली आहे तो एक मोठी आरोळी ठोकतो जिंकल्याची. त्या दोघा वीराना आनंद झालेला असतो. अर्जुन मात्र अजून आणखीन पळणारे प्राणी मारत असतो. कोणाही प्राण्याची तेथे लढण्याची हिम्मत दिसत नव्हती. अर्जुनाचे भाते बाणांने सतत भरत होते व तो ते बाण मारत होता. तेथे मरून पडलेले सगळे प्राणी आता तो अग्नी निर्धास्तपणे भक्षण करत होता. जे जगले होते ते दुःखाने रडत होते. त्यांना वाचवणारे कोणीही नव्हते. ह्या घटनेमुळें गंगेत रहाणारे मांसे, विंध्याद्रीत रहाणारे प्राणी अस्वस्थ झालेले होते. त्यांच्या त्या रुद्र रुपाकडे कोणाही पाहू शकत नव्हते. जे राक्षस, दानव आणि नाग त्याच्यावर हल्ला करून गेले होते त्यांना तो चक्राने ठार करतो. त्या वेगवान चक्रामुळें त्याच्या शरीराचे असंख्य तुकडे होत होते. भरपूर मांस, चरबी, रक्त, हाडे खावयाला मिळाल्यामुळें तो संतुष्ट झालेला अग्नी त्याच्या जिभा उंच आकाशात लवलवत आपला आनंद दाखवत असतो. त्या प्रसंगी ते पहातात किं, तक्षकाच्या घरातून एक असुर ज्याचे नांव माया होते, तो त्या आगीतून पळून जात होता. ते पहाताच कृष्ण व अग्नी त्याच्या मागे लागतात. माया अर्जुनाला विनंती करतो कृपया मला वाचव मी माया आहे. ते ऐकून जिश्नु त्याला आश्वासन देतो किं, कांहीं घाबरू नकोस, तो दशरथ आहे तो तुला मारणार नाही कारण त्याला माहीत आहे किं, तू मामुचीचा भाऊ आहेस. अग्नीसुद्धा तुला स्पर्श करणार नाही.

कृष्ण व अर्जुनाच्या मदतीमुळें अग्नी सगळे खांडववन जाळून टाकतो फक्त सहा जण वाचतात. त्यात अश्वसेन, माया आणि चार सारंग जातीचे पक्षी असतात.

अशारितीने आदिपर्वातील खांडव वन पर्वाचा दोनशे तिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे एकतीस

(खांडववन दहन पर्व पुढे चालू)

जनमेजय विचारतो, "अहो ब्राह्मण, मला सांगा, ते खांडव वन कां जाळले गेले? अग्नी सारंग पक्षाला कां खात नाही"? तुम्ही मला अश्वसेन आणि माया ह्या दोघांना का सुटका मिळाली ते सांगितले परंतु, सारंग पक्षाबद्दल सांगितले नाही तरी ते सांगा. त्या पक्षांची सुटका मोठी मजेशीर झाली असेल असें वाटते. मला सांगा ते सगळे".

वैशंपायन सांगत असतात, अहो राजर्षी, मी सगळें सविस्तरपणे सांगतो. एकेकाळी एक ऋषी होऊन गेला मोठा गुणवान होता, त्याचे नांव मंडपाल असं होते. तो विविध शास्त्रात निपुण होता. मोठा व्रतस्थ होता आणि वैराग्य पूर्ण जीवन व्यतीत करीत होता. त्याचे त्याच्या भोग इंद्रियांवर पूर्ण संयमन होते, त्याचा सर्व समय वेदाच्या अभ्यासात आणि पूण्यकर्मात जात असें. यथावकाश तो माणूस जन्म सोडून पितर लोकांत जातो. परंतु, तेथे गेल्यावर त्याला त्याची अपेक्षित फळं मिळाली नाहीत. तो यमा भोवती बसलेल्या देवांना विचारतो, "असें कां होते कीं, ह्या भागांत मला योग्य साथ मिळत नाही"? "मला वाटत होते कीं, हा भाग मी माझ्या अध्यात्मिक सामर्थ्याने मिळवला आहे. मला सांगा मी केलेल्या वैराग्य कर्माचे मला फळ कां मिळत नाही"? "काय माझी तपस्या योग्य नव्हती"? अहो देवांनो, कृपया माझ्या शंकेचे निरसन करा". ते ऐकल्यावर ते देव बोलले, "अरे ब्राह्मणा, त्यासाठी जे करावयाला पाहिजे त्यात धर्मकार्य, तपस्या, वैराग्य आणि संतति असें सगळे त्याला प्राप्त करावयाचे असते. त्यातील तू पहिले तीन केलेस पण तुला अपत्य नाही म्हणून तू असा राहिला आहेस. त्या कारणांने तुला ते फळ मिळत नाही. म्हणून तू जर अपत्य प्राप्त केलीस तर तुझी साधना परिपूर्ण होईल व तुला स्वर्गातील त्या भागात शिरकाव मिळेल". पुढे देव सांगतात, "अरे ब्राह्मणा, तुला माहीत आहे नां कीं, पुत नरकात ते जातात जे पुत्रहीन असतात. म्हणून पुत्र म्हणजे पुत नरकापासून वाचवणारा त्याला पुत्र असें म्हणतात. म्हणून अरे ब्राह्मणा, तू पुत्र होण्यासाठी प्रयत्न कर म्हणजे तुझी साधना पूर्ण होईल".

वैशंपायन पुढे सांगतात, देवांचा तो सल्ला ऐकल्यावर मंडपाल विचार करतो कीं, कमीतकमी वेळांत मला जास्तीत जास्त अपत्य प्राप्त केले पाहिजेत. त्याच्या लक्षात येते

कीं, पक्षी हा असा प्राणी आहे ज्याची प्रजनन क्षमता कमाल असते. म्हणून तो एका सारंग पक्षाचे रुप घेतो, एका सारंग मादीशी संबंध ठेवतो. त्या मादी सारंग पक्षिणीचे नांव असते, जरीता. तिच्या पासून त्याला चार पुत्र होतात. त्यांना तो वेद शिकवतो. ते सगळे अजून अंड्यात असतांना तो ऋषी त्यांना त्यांच्या आईकडे ठेवून कारण ते अजून अंड्यात असतात, आपल्या दुसर्या पत्नीकडे जातो. त्या दुसर्या बायकोचे नांव असते लपिता. आपल्या लेकरांच्या प्रेमाखातर ती जरीता विचार करू लागते, ती विचार करते, जरी त्यांच्या पित्याने त्यांना सोडले आहे तरी मी त्यांचा सांभाळ करणार आहे. ऋषी लपिता बरोबर खांडव वनात भटकत असतांना त्याला अग्नी येतांना दिसतो. अग्नीचा ते वन जाळून टाकण्याचा उद्देश त्याला समजतो. त्याच्या लक्षात येते किं हा अग्नी खांडव वन जाळणार आहे व माझी चार अपत्ये तेथेच आहेत, आता काय करावे असा प्रश्न त्याला पडतो. मंडपाल अग्नीला भेटून विनंती करतो किं, त्याची चार अपत्ये अजून अंड्यात आहेत व ती त्याने जाळली तर अभद्र होईल. तरी त्याने त्या चारांना अभय द्यावे. मंडपाल अग्नीची स्तुती करतो, "अहो देवांच्या मुखा, जो तुपाचे अर्घ्य घेतो, जो सगळ्या पापांचा नाश करतो, जो सगळ्या सजीवात अदृष्यपणे वास करतो, ज्याच्यात तिनही गुण असतात, तुझ्या आठ मुखांचे समाधान करत ऋषी तुझी आराधना करतात, ते ऋषी सांगतात कीं, हे जग तुझ्यामुळें अस्तित्वात आले. तू मुळतः यज्ञातील तुपाच्या आहुतिवर जगत असतोस असें सगळे जाणकार सांगतात, हे जग तुझ्या शिवाय कांहीं क्षणात नष्ट होईल असे आहे, तुला नमस्कार करून, सगळे ब्राह्मण त्यांच्या बायकांमुलांबरोबर त्यांच्या सुकर्माची फळं भोगण्यासाठी जातात. विजा चमकणार्या ढगात तू असतोस. तुझ्या जिभा सगळे भस्म करतात, असें सांगतात, हे विश्व तू उत्पन्न केलेस, म्हणजे तुझ्यातून उत्पन्न झाले आहे, वेद तू सांगितलेस, चराचर सगळें तुझ्याशिवाय जगू शकत नाहीत. पाण्याचे स्रोत तुझ्यावर अवलंबून असतात, तसेंच सगळे जग तुझ्याशिवाय शक्य नाही, पितरांचे व देवांचे भक्ष्य तुझ्यातूनच होत असते, अरे अग्नीदेवा तू सगळे भक्षण करतोस, तूंच साक्षात बृहस्पती आहेस. तूंच आश्विनी, तूमच सूर्य, तूंच सोम, तूंच वायु आहेस". अशा स्तुतीमुळें अग्नी संतुष्ट होतो.

वैशंपायन पुढे सांगतात, मंडपालाच्या त्या स्तुतीमुळें अग्नी पिघळून जातो व विचारतो, "तुला काय पाहिजे"? ते ऐकल्यावर उत्साहीत होऊन तो ऋषी दोनही हात जोडून अग्नीला आर्जव करतो किं, "जेव्हा तू खांडव वन जाळशिल तेव्हा माझ्या चार मुलांना स्पर्श करू नकोस". ते ऐकल्यावर मंडपालाच्या स्तुतीसुमनांने संतुष्ट झालेला अग्नी "तथास्तु" असें बोलतो.

अशारितीने आदिपर्वातील खांडजववन दहन पर्वाचा दोनशे एकतिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे बत्तिसवा

(खांडववन दहन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, जेव्हां खांडववन जळू लागले तेव्हां त्या झळीने त्या लहानग्यांना फार त्रास होऊ लागला. त्या काळजीने व्यथित झालेली त्यांची आई, जरिता कोठे त्या जाळापासून निसटून जाण्याचा मार्ग सुद्धा दिसत नव्हता. तिला समजत होते किं, ती लहान बाळ खूप छोटी होती, त्यांना पिसं आणि पायसुद्धा आलेले नव्हते. असहायतेने ती माता मोठ्याने ओरडून आकांत करू लागली. तो अग्नी झपाट्याने चहोबाजूस पसरत होता. नासमज अशी ती चार छोटी पक्षीबाळं आपल्या पूर्वजांचे स्मरण करत होते. अहो आमचे पूर्वजानो हा पहा अग्नी जवळ येत आहे आम्हाला वांचवा, वांचवा असें त्यांच्या छोट्या चोचीतून बोलत होते, जणू काय. जरीता सांगते, "त्या तिच्या चिमण्या बाळांना अहो मीच जाऊ शकत नाही ह्या जाळांतून तर तुम्हाला कसे काढणार"? ती विचार करते जर मरावयाचे तर एकत्र मरू, माझ्या इवल्याशा पिलांना सोडून जर वाचले तर मी स्वतःला माफ करू शकणार नाही. आम्ही सगळे येथे एकत्र मरणार आहोत. त्या ज्वाळा जंगलातील उंचच उंच झाडांच्या वरच्या झाळींना भाजत होत्या अशातून कोणीही सुटणे केवळ अशक्य होते. जर येथून पळून जायचे तर एकाला घेऊन जाऊ म्हंटले तर कोणाला घेऊ आणि कोणाला नको असें कळत नाही, त्यापेक्षा एकत्र मरणेंच योग्य असा विचार ती जरीता करत असते. कोणते कृत्य अशा परिस्थितीत योग्य ते तिला समजत नव्हते. तुमचे पिता असेंच सोडून गेले त्यावेळी बोलले होते त्यातील मोठा त्यांच्या कुळांचा उद्धार करील. म्हणजे मोठ्याला मी वाचवावे तर बाकीच्यांनी काय केले म्हणून त्यांना मी असें आगीत टाकून द्यावे. जरीताला मंडपालाचा राग आलेला असतो. ती तिच्या मनात बोलत होती, "तुमचा दुष्ट बाप जाण्या आधी मला बोलला, त्याचा मोठा मुलगा, जरीतारी त्याचा वंश चालवेल दुसरा मुलगा सरीश्रिक माझ्या पूर्वजांचा वारसा चालवेल, तिसरा स्तम्वमित्र त्याची वैराग्याची व संन्यासाची परंपरा चालवेल आणि धाकटा द्रोण वेदांचा अभ्यास करील. पण आता पहा काय होत आहे हे? अशारितीने हे सगळेच आपापल्या कर्तव्यासाठी जगणे आवश्यक आहे मग मी कोणा एकाला घेऊन जाणे कसे योग्य होईल"?

वैशंपायन पुढे सांगतात, त्या छोट्या पिलांची आई अशाप्रकारे काळजी करत असतांना परिस्थितीचा अंदाज असलेले ते चार तिला सांगतात, "माते तू आम्हाला सोडून स्वतःला वाचव कारण जर तू मेलीस तर तुझा वंशसुद्धा नष्ट होईल. आम्ही मेलो तर फार कांहीं बिघडत नाही कारण आम्ही पुनः जन्म घेऊ. तू आमच्या वरील मायेने येथे राहिलीस तर सगळेच संपेल. तू राहिलीस तर तू व आमचे पिता पुन्हा आम्हाला जन्म देऊ शकता. म्हणून आई तू त्वरित येथून निघून जा, आमची चिंता करू नकोस. आम्ही तुमच्या पोटी पुनः आल्याने आमच्या बाबांची स्वर्गातील स्थान मिळवण्याची इच्छा पूर्ण करता येईल. सर्व कांहीं भले होईल, तर तू जा"! ते ती ऐकत असतांना तिला जवळच एक बिळ दिसते. ती त्या पिलांना सांगते, "बाळांनो ते पहा बिळ आहे उंदराचे, त्यात जाऊन लपा. तुम्ही तेथे सुरक्षित व्हाल. तुम्ही आत शिरल्यावर बाहेरून मी ते मातीने झाकून टाकीन त्यामुळें तो अग्नी आत शिरणार नाही. जेव्हां आग विझेल तेव्हां मी परत येईन". पिलं बोलतात, "आम्ही पिसाशिवाय केवळ एक मांसाचा गोळा आहोत. जर त्यात उंदीर असेल तर तो खात्रीने आम्हाला खाऊन टाकेल, एका बाजूस आग व दुसर्या बाजूस उंदीर अशी अवस्था झाली आहे. हा अग्नीमुळें आमच्या बाबांची स्वर्गातील जागेची इच्छा अपूर्णच रहाणार आहे असें दिसते. आम्हाला वाटते कोठूनही मृत्यू अटळ आहे मग जळून मरणे उंदराच्या खाण्यापेक्षा जास्त श्रेयस्कर वाटते आम्हाला, कारण शास्त्र सांगते, उंदरासारख्या नीच प्राण्याने खाल्ले जाण्याने आपण पाताळात जाऊ परंतु, अग्नीने खाल्ले तर आपण स्वर्गात जाऊ. म्हणून आम्ही जेथे आहोत तेथेच राहू, तू मात्र निघून बाबांच्या कडे जा व सगळें त्याना सांग. आम्ही पुनः येऊ आई, दुःख करण्यात वेळ घालवू नकोस".

अशारितीने आदिपर्वातील खांडववन पर्वाचा दोनशे बत्तिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे तेहतिस

(खांडववन दहन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, ते त्या पिलांचे बोलणे ऐकल्यावर जरीता त्यांना सांगते, "अरे मुलांनो तुमचा कांही गैरसमज होत आहे, त्या बिळातील उंदीर एक घार केव्हाच तिच्या पंजांत पकडून घेऊन गेलेली मी पाहिले आहे. ते बिळ रिकामे आहे, त्यात आता कोणीही नाही. म्हणून निर्धास्तपणे तुम्ही त्यात जाऊन लपा". त्यावर ती पिलं तिला बोलतात, "अग आई, त्यात एकच उंदीर आहे असें कसें तू समजतेस? आणखीन बरेच असू शकतील त्यांचे काय"? त्या उलट आम्हाला वाटते तो अग्नी बहुतेक आमच्यापर्यंत येणार नाही"? कारण कीं, आम्ही आताच पाहिले आहे किं वार्याची दिशा विरुद्ध आहे व त्यामुळें तो अग्नी येथे पोहोचणार नाही कारण, आई तुला माहीत आहे नां कीं, अग्नीला पसरण्यासाठी वायूची मदत लागते, त्याच्या मदतीशिवाय अग्नी एकाद्या कैद्यासारखा जागच्या जागीच अडकून रहातो. त्या बिळात आमचा मृत्यू निश्चित आहे पण येथे बाहेर आम्हाला वाचण्याची संधी तो प्रेमळ वारा खात्रीने देईल असें वाटते म्हणून आपण सारे त्या वायूला आळवणी करू. पक्षी वार्याचे सवंगडी असतात म्हणून तो आम्हाला निश्चित मदत करील. अनिश्चित गोष्टींपेक्षा निश्चित गोष्टींचा भरवसा करावा. तू आता आमची फिकीर न करता येथून निघून जा व बाबांना भेट, ते जास्त महत्वाचे आहे, कारण आमच्या आई, एक गोष्ट खरी आहे किं, जर मृत्यू आमचा असेल तर तो येणारच व जर नसेल तर तो येणार नाहीच हेंच खरे, मग कशाला चिंता करावयाची"? "जर ह्या जन्माचा आपला संयोग संपला असेल तर पुढच्या जन्मी आम्ही तुला निश्चित भेटू. आई, त्यासाठी तुझे जगणे जास्त महत्वाचे आहे. तू रडू नकोस, आशावादी रहा". असें बोलून ते चारही जण आईला धीर देण्याचा प्रयत्न करतात. ती आई तरी पुनः पुन्हा आग्रह करते कीं, त्या पिलांनी त्या बिळात जावे व ती पिलं तिला सांगत होती तेथे दुसरा उंदीर नाही ह्याची खात्री काय? शेवटी ती मुलं तिला विचारतात, "तू कां तुझा जीव धोक्यात घालतेस आई? तू जा आणि आमचे नशीब आमच्यावर सोड, त्यातच आपल्या कुटूंबाचे भले आहे. तुला आमचा कांहीं उपयोग नाही. मग अशी खोटी गोष्ट सांगून तू कां असा आग्रह करत आहेस"? जेव्हां विश्वास डळमळीत होतो तेव्हां तो जे करील त्याचा भरोसा करावयाचा

नसतो. तुला आमची फिकीर आहे हे पाहून आम्ही चौघे तुझ्यावर संतुष्ट आहोत हे तुला पुरेसे आहे. आता त्वरा कर व ही जागा सोडून सुरक्षित ठिकाणी जा, आमच्यासाठी ते जास्त योग्य आहे. जर आम्ही ह्या वणव्यात जळलो नाही तर तू पुन्हा परत ये व आम्हाला भेट. असें बोलून ती चारही पिलं तिला निर्वाणीचा निरोप देतात. ती समजते कीं तिची पिलं खूप शहाणी आहेत व त्यांचे भले त्या वार्यावर सोडून ती पक्षीण उडून जाते. ती पक्षीण त्या वार्याला सांगते, कृपया आता तुझ्यावर माझी जी भक्ती आहे त्याची प्रचिती मला येईल कीं, तू माझ्या पिलांना किती सांभाळतोस.

ती पक्षिण अशा जागी जाते जेथे आग पोहोचत नाही. आता जेथे पिलं आहेत त्या भागाकडे मात्र अग्नी वेगांने पसरत असतो. मंडपालाची पिल ते पहातात. त्यांच्यातील मोठा, जरीतारी, ओरडून बोलतो.

अशारितीने आदिपर्वातील खाडव वन दहन पर्वाचा दोनशे तेहतिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे चौतिसावा

(खांडववन दहन पर्व पुढे चालू)

जरीतारी बोलतो, "शहाणा त्याच्या मृत्यूची चाहुल आल्यावर सावध होतो, त्यामुळें जेव्हां प्रत्यक्ष मृत्यू त्याला गाठतो तेव्हां त्याला त्याची भिती वाटत नाही कारण, त्याला त्याची अपेक्षा असते. परंतु, ज्याचा विवेक भ्रष्ट झाला आहे तो त्या परिस्थितीत मृत्यूच्या आवाजाने घाबरून जातो".

दुसरा मुलगा, सरीश्रिक बोलतो, "तू माझ्या मोठ्या भावा, धीरोदात्त व बुद्धिमान आहेस, फार थोडे असें शांत राहू शकतात". तिसरा भाऊ, स्तम्वमित्र बोलतो, "सर्वात मोठा भाऊ धाकट्याचा संरक्षक समजला जातो. जेव्हां तोच त्यात अयशस्वी होतो, धाकटे काय करणार"?

धाकटा भाऊ, द्रोण बोलतो, तो पहा अग्नी आपल्या कडे सरकत आहे. त्याच्या सात जीभा व सात तोंडं लवकरच आपल्याला संपवणार आहे.

वैशंपायन पुढे सांगतात, अशाप्रकारे ते एकमेकांशी संभाषण करतात. त्या नंतर धाकटा द्रोण विचारतो, "आपण अग्नीकडे दयाभीक मागू शकतो कां"? मोठा सांगतो, "पंचमहाभूतात अग्नी एक आहे व ते दया दाखवत नाहीत म्हणून तेथे दयाभीक मागून उपयोग नाही". तो पुनः विचारतो, "पंचमहाभूतांना न्याय अन्याय ह्यांचे बंधन असते कां"? मोठा उत्तर देतो, "पंचमहाभूतांना फक्त त्यांना ब्रह्माने घालून दिलेल्या नियमांचे बंधन असते. त्याशिवाय ते कांहींही करत नाहीत म्हणून त्याला दयेची आळवणी करण्यात कांहीं तथ्य नाही. परंतु, पंचमहाभूतातील परस्पर संबंध नियंत्रित करून त्याना वळवता येईल". "अग्नीला वायु मदत करतो व पाणी विरोध करते. तरी ह्या पंचमहाभूतांना नियंत्रित करणार्या देवतांना दयाभीक मांगता येईल, तसे करून पहावे", मोठा सुचवतो.

धाकटा म्हणतो, "तरी जर आपण त्यांची स्तुती केली तर त्यांना नियंत्रित करणारी देवता प्रसन्न करून आपण अग्नीला थांबवू शकू असे मला वाटते".

त्यानंतर ते मंडपालाचे चारही चिरंजीव दयाभीक आळवायला लागतात, त्यात प्रथम स्तुती सुमन असतात रितीप्रमाणे, ती वेदातील ऋचा असते,

जसें जरीतारी बोलतो तसे येथे सांगतो, "अहो अग्नी, हवेचा आत्मा, पृथ्वीवरील वनस्पतींचे अंग अशा अग्नी, तू पाण्याचा जन्मदाता व पाणी तुझा जन्मदाता, तुझ्या जीभा सर्व बाजूंना पसरत आहेत, तुला मी वंदन करतो.

सरीश्रिक म्हणतो, "ज्याचा धूर ध्वज आहे, ज्यामुळें आम्ही आमची आई आकाशात उडतांना पाहू शकत नाही. आम्हाला माहीत नाही आमचे पिता कोठे गेले, आमची पिसं अजून वाढलेली नाहीत, आम्ही आमचे संरक्षण करण्यात असमर्थ आहोत तरी तू आमचे संरक्षण कर कारण, अहो अग्नीदेवा, आम्ही खूप लहान आहोत. तू कधी अन्याय करणार नाहीस म्हणून, तू आमच्यावर दया दाखवून आमच्या पासून दूर रहा. तुला माहीत आहे कीं आम्ही ऋषी आहोत व एका ऋषीच्या पोटी आलो आहोत तरी तू आमचे तुझ्याच उष्णतेपासून संरक्षण कर. उष्णता तुझा गुण आहे तो तूच नियंत्रित करू शकतोस म्हणून अहो अग्नीदेवा आम्हाला जीवनदान दे. अरे हव्यहवा, आमच्यावर कृपा कर व दुसर्या वाटेने पुढे जा. तूंच जगाला जगवतोस व तूंच मारतोस, तूंच यज्ञाचा कर्ता आहेस व तूंच यज्ञातील तूप खातोस, शहाणे जाणतात कीं, तूंच कारण आणि तूंच परिणाम असतोस. तूंच जगाच्या उत्पत्तीचे कारण आहेस व तूंच नाशाचेसुद्धा कारण आहेस. शेवटी सगळे तुझ्यातच विरून जाणार असते मग आत्ताच काय घाई झाली आहे आम्हाला घेण्याची? अरे हव्यहवा आमची साधना अजून अपुरी आहे ती पूर्ण करण्यास सवड दे.

स्तम्वमित्र प्रार्थना करतो, आपणच सर्वस्व अहात. हे सगळे विश्व तुमच्यात सामावलेले आहे. सगळ्या जीवांचे पोषण व संवर्धन आपणच करता. यज्ञाचे तूप तुमच्यासाठी असते. आपणच स्वतः ते अर्घ्य अहात. शहाणे लोक जाणतात कि, आपणच कारण व परिणाम असता, जे जे घडते त्यात. स्वर्ग, पृथ्वी व पाताळ आपणच उत्पन्न केले आहेत. जेव्हां समय होतो तू ते संपवतोस तुझ्या तेजांने, किंवा ते तू गिळंकृत करतोस स्वतः फुगून. ह्या सृष्टीचे तू एकमेव कारण आहेस व तूंच त्याचा गाभा आहेस.

द्रोण प्रार्थना करतो अग्नीदेवाचा अशी, "अहो जगाच्या राजा, आमच्याच पोटात राहून तू आम्हाला जीवंत ठेवतोस. म्हणून तूंच सर्वस्व आहेस. अहो शुक्र, तुझ्या तोंडातून वेद बाहेर आले, तूंच सूर्य व तूंच तारे आहेस, तूंच समुद्राचे पाणी खेचून परत पृथ्वीवर टाकतोस व त्यामुळें सगळी चराचर सृष्टी संपन्न होत असते, तुझ्यामुळें पाऊस पडतो व

तळी, तलाव, नद्या भरभरून वहात असतात. तुझ्या तीव्र किरणांमुळें वरुण काम करू शकतो. तरी तुझी ही उष्णता आम्हाला सहन होत नाही. आमचा संरक्षक हो व आम्हाला आमचे जीवन जगण्याचा एक संधी दे. जसे समुद्र त्याच्या लाटा किनार्यावरील घरांपासून दूर ठेवतो तसे तू आमच्या पासून तुझ्या ज्वाळा दूर ठेव. कोठे तरी दूर जा. एवढी कृपा कर".

वैशंपायन सांगतात, त्या लहानग्या पिलांच्या त्या कोवळ्या प्रार्थना एकून तो अग्नी जो तोवर भरपूर भक्षण करून तृप्त झालेला असतो व त्याशिवाय त्यांने मंडपालाला आश्वासन दिलेले असते म्हणून तो तेथून दूर होतो. अग्नी द्रोणाला बोलतो, "अरे तू खराच ऋषी आहेस कारण, तू आता वेदातील कवन गांत होतास. घाबरू नकोस, मी तुम्हाला स्पर्श करणार नाही. तुमची साधना पूर्ण करा. मी तुम्हा चौघांवर खूष झालो आहे. तुमच्या सांगण्याचा अर्थ मला समजला, मी अन्याय करता कामा नये हा तुमचा मुद्दा मला भावला आहे. तुमच्या गाण्याने मी प्रसंन्न झालो आहे. अहो ब्राह्मणो तुमचे भले हो".

लहान द्रोण अग्नीला तक्रार करतो, "अहो हुताशनि, ती मांजर आम्हाला फार सतावते तीला व तिच्या आप्तांना तुम्ही खाऊन टाका".

वैशंपायन सांगतात, त्या ब्राह्मण पक्षीस्वरुपात असलेल्या ऋषींना संरक्षण देण्यासाठी तो त्या मांजराला व त्याच्या सारख्या इतर हिंसक प्राण्यांना फस्त करतो. त्यानंतर अरे जनमेजया मी काय सांगू, तो अग्नी त्या पक्षांना सोडून दुसरीकडे सरकतो व बाकीचे खांडववन जाळत जातो.

अशारितीने आदिपर्वातील खाडववन दहन पर्वाचा दोनशे चौतिसावा भाग संपला

# आदिपर्व भाग पस्तिसावा

(खांडववन दहन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे बोलतात, अरे जनमेजया, कुरुवंशी राजा, तेथे ऋषी मंडपाल त्याच्या पुत्रांसाठी बेचैन झाला होता. जरी तो अग्नीदेवाशी त्यांच्या बद्दल बोलला होता व अग्नीदेवावर त्याचा विश्वास होता तरी ते बापाचे हृदय होते व त्याला पुढच्या तयारीची फिकीर होती. तो त्या अस्वस्थ मनस्थितीत होता. त्याच्या बरोबर त्याची दुसरी पत्नी होती. तिला उद्देशून तो बोलतो, "प्रिय लपिते, माझी मुलं खूप लहान आहेत, ते स्वतःची देखभाल करण्यास असमर्थ आहेत. जेव्हां अग्नी जोरात येईल व वारे वाहू लागतील तेव्हां माझी मुलं त्यांचे संरक्षण करू शकणार नाहीत. मला चिंता खात आहे, त्यांची आई जी त्यांच्या बरोबर आहे त्या लहानग्यांना कसे त्या आगीपासून वाचवेल"? माझी ती बायको निष्पाप आहे, ती मोठ्या दुःखात असेल ह्या सगळ्या परिस्थितीमुळें, ती दुःखावेगांने कष्टी झाली असेल. माझा मोठा जरीतारी कसा असेल? माझा दुसरा मुलगा सरिश्रिक कसा असेल? माझा तिसरा मुलगा स्तम्वमित्र कसा असेल? माझा धाकटा द्रोण कसा असेल? ह्या विवंचनेत मी आहे. लपिते मला कांहीं समजत नाही मी काय करावे, ती पहा आग पसरतच आहे. काय मी जी विनंती अग्नीला केली तो लक्षात ठेवेल कां? जर तो ते विसरला तर माझ्यावर ब्रह्मांड कोसळणार आहे, लपिते, तुला समजते कां मी काय बोलत आहे". ते तिच्या पतिचे दुःखोद्गार ऐकल्यावर सवती मत्सराने ती फणकारते, "माझ्या समक्ष तू अग्नीदेवाला सांगितले आहेस मग तू असा कां विव्हळतो आहेस? अग्नीदेवाबद्दल शंका घेणे अप्रस्तूत आहे हे तुम्हाला माहीत नाही कां"? अग्नी हे एक ह्या विश्वाचे कर्ते आहेत त्यांच्या वर तू विसरभोळेपणाचा आरोप करतोस हे योग्य नाही. विशेष म्हणजे त्यांनी तुला आश्वासन दिले आहे किं, तुझी मुलं त्या वणव्यात सापडणार नाहीत. मग तू निर्धास्त रहावयास पाहिजेस. अग्नीदेवावर अविश्वास दाखवणे पाप नाही कां? तुला माझी कांहींच पर्वा दिसत नाही, कधीही पहावे त्या सटवीचीच तुला काळजी असते, आणि त्या कारट्याची, माझे काय? मला मुलं झाली नाहीत त्यात माझा कांही दोष नाही. तू मला काय वाटते त्याचा सुद्धा विचार कर, ते माझ्यामते जास्त महत्वाचे आहे. दोन बायका केल्यास तर त्यांना सारखेपणे सांभाळायला शिक".

"असें असेल तर तू त्या जरीताकडेच जा, माझ्याकडे येऊच नकोस. मग मी वेड्या सारखी भटकत राहीन एक शिक्षा कारण, मी एका हलकटाशी लग्न केले".
ते तिचे जिव्हारी लागणारे बोलणे ऐकल्यावर मंडपाल तिला समजावण्याचा प्रयास करतो. "तू असें बोलू नकोस, मला समजून घे, मी येथे आलो ते अपत्ये व्हावी म्हणून, मला कोणाबरोबर संसार करण्याची इच्छा नाही. कांहीं मिळवण्यासाठी कांहीं सोडणे हे हलकटपणाचे होईल मी तसे कांहीं करत नाही. मी जर असें केले तर जग माझा धिक्कार करेल. माझ्या लेकरांकडे मला गेलेंच पाहिजे, तू जर तसे समजत असशील तर मला सोडून कोठेही जाऊ शकतेस. हे जळणारे वन माझ्या जीवाला धसका देत आहे. नसत्या विचारांचे काहूर माजले आहे माझ्या मनांत.
वैशंपायन सांगत असतात, तो अग्नी त्या ठिकाणाहून दूर गेलेला पाहून जरीता उडत त्या ठिकाणी येते. आपली लेकरे सुखरुप आहेत कां ते तिला पहावयाचे असते. तिला दिसते किं, ती सगळी पिलं तेथे सुखरुप आहेत. आई आलेली पहातांच ते सगळे रडू लागतात. आता ते सगळे एकत्र आनंदाश्रू ढाळू लागतात. जीवावरचे अरिष्ठ टळल्याचा त्यांना मोठा आनंद झालेला असतो. जरीता त्या सगळ्या लहानग्यांना स्वतः जवळ ओढून घेते व तसें ते थोडावेळ रहातात. तो प्रसंग जीवाला चटका लावणारा होता. त्याच वेळी ऋषी मंडपाल तेथे येतात. सगळे एकदम आनंद व्यक्त करतात. काय झाले कसे झाले अशी सर्व चर्चा त्यांच्यात रंगते. ती चारही त्यांच्या पित्याला त्यांच्या पद्धतिने जे घडले ते मोठ्या हिरीरीने सांगतात. परंतु, कोणीही मंडपालाला तो कोठे गेला होता असें चुकूनही विचारत नाहीत. त्या सगळ्या सारख्याच दिसणार्या पिलांकडे पहात तो जरीताला विचारतो, "मला सांग, ह्यातला मोठा कोण, त्यानंतरचा कोण, तिसरा कोण व धाकटा कोण ते मला समजत नाही तर ते मला सांग". जरीता मात्र आता तिचा सवती मत्सराचा राग मंडपालावर काढते, ती बोलते, "तुम्हाला काय करावयाचे आहे, ह्यातला कोण पहिला, कोण दुसरा, कोण तिसरा आणि कोण चौथा, तुम्ही तुमच्या लपिताकडेच जा. ती सुंदर स्मित करते व चांगली जवानसुद्धा आहे. आता मी म्हातारी झाली मला चार मुलं झाली तेव्हां तू मला सोडण्याच्याच विचारात आहेस हे माला चांगलेच समजते. बायकांसाठी त्यांचा नवरा दुसरी कडे जातो हेंच मोठे दुःख असते. तुम्हा पुरुषांना ते समजणार नाही कारण तुम्ही

स्त्री नाही"! "बायकांसाठी नवर्याची भानगड आणि दुसरी पत्नी हेंच पिडा देणारे असतात. ह्याला पवित्र अरुंधती सुद्धा अपवाद नाही. तुम्हाला माहीत असेल तीने तिच्या नवर्याचा वसिष्ठांचा जे सप्तर्षीपैकीं एक आहेत, अशा संशयामुळें अपमान केला होता. नाही सहन होत आपला पति कोणा दुसर्या बाईबरोबर जातो ते. त्या तिच्या कृत्यामुळें ती आज एक तारा बनून राहिली आहे. कधी दिसते कधी दिसत नाही अशी तिची अवस्था आहे. मला फक्त माझ्या लेकरांची काळजी आहे. मला बाकी कांहीं नको.

मंडपाल थोडा रागावून बोलतो, मी ह्या मुलांसाठी तुझ्याकडे आलो आहे. मी तुला कधीही दुखवलेले नाही जसें वसिष्ठानी कधीही अरुंधतीला दुखवले नव्हते. पुरुषांनी कधी त्यांच्या पत्नीवर विश्वास ठेवू नये विशेषकरून त्यांना मुलं झाली कीं कारण, त्यानंतर त्यांचे सारे लक्ष असते त्या मुलांकडे व पति जणूकाय त्यांना नकोसा होतो. मंडपालाची चारही मुलं त्याला बिलगतात व तोसुद्धा त्यांना व जरीतालासुद्धा तो जवळ घेतो, त्यांच्यात पुनः सलोखा होतो.

अशारितीने आदिपर्वातील खांडववन दहन पर्वाचा दोनशे पस्तिसावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे छत्तिसावा

(खांडववन दहन पर्व संपले)

वैशंपायन बोलतात, मंडपाल त्यानंतर त्याच्या मुलांना जवळ घेऊन सांगतो, "मी तुमच्याबद्दल अग्नीकडे बोललो होतो व तो त्यासाठी तयार झाला होता कारण, तो तुम्हाला सुद्धा ऋषी म्हणूनच ओळखत होता. माझ्यामुळें तुमची आई नाराज आहे पण ती सगळे समजल्यावर शांत होईल ह्याबद्दल मला खात्री आहे. म्हणून माझ्या मुलांनो माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नका.

वैशंपायन नंतर बोलतात, असें आश्वासन दिल्यानंतर, तो ब्राह्मण आपली मुलं व बायको जरीता घेऊन दुसर्या ठिकाणी रहावयाला जातात. अग्नीदेव भरपूर मांस, चरबी फस्त करून मोठा झालेला असतो. त्या जंगलातील सर्व वाईट ताकदी नर आणि नारायणांच्या मदतीने त्यांने भस्मसात केलेल्या असतात. त्या सगळ्या प्रयोजनामुळें, कृष्ण व अर्जुनांवर अग्नी खूप संतुष्ट झालेला असतो. आता तो अग्नी त्या ब्राह्मणाच्या रुपात प्रकट होतो. त्यानंतर पुरंदर त्याच्या जाम्यानिम्यानिशी आकाशातून खाली येतो. तो कृष्णाला व अर्जुनाला बोलतो, तुम्ही जे केले ते देवांनासुद्धा करता येणे शक्य नव्हते. इंद्र त्यांना विचारतो ह्या कार्यासाठी मी तुम्हाला कोणता वर द्यावा ते ठरवा.

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर अर्जुन इंद्राकडील सगळी अस्त्रं मागतो. इंद्र आश्वासन देतो किं, जेव्हा माधव तसे करण्यास मला सांगेल तेव्हा ती तुला मिळतील. तुझे वैराग्य व तपस्या पहाता, माझी अग्नीची व वायूची अशा सगळी आयुधं मी तुला देईन. त्यांचा गैर वापर होऊ नये ह्यासाठी अशाच विरक्त प्रवृत्तीच्या इसमाला ती देता येतात व तू त्या प्रकारचा आहेस. वासुदेव इंद्राला सांगतो आमची मैत्री अनादि अनंत काळाचीच आहे त्याबद्दल काळजी नको. असें सगळे बोलणे झाल्यावर इंद्र व मरुत त्यांच्या परिवारासह आकाशात निघून जातात.

अग्नीसुद्धा त्या अच्युत व धनंजय, दोघा वीरांना अभिष्टचिंतन करून सांगतो कीं, आता काम पूर्ण झाले आहे तेव्हां तुम्ही दोघे कोठेही जाण्यास माझी हरकत नाही. त्यानंतर कृष्ण, अर्जुन व दानव माया असें तिघे नदीकिनार्याने मजेत गप्पा मारत भटकत फिरत एका ठिकाणी येऊन ठेपतात.

अशारितीने आदिपर्वातील खांडववन दहन पर्वाचा दोनशे छत्तिसावा भाग संपला.

**- महाभारतातील आदिपर्व खंड पांचवा समाप्त –**

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद